cmyk

## संपादकीय

### मुंबई–पुणे ठप्प

६ जुलै २०२६. महाराष्ट्रासाठी हा दिवस केवळ मुसळधार पावसाचा नव्हता; तो आपल्या विकासाच्या मॉडेलची कठोर परीक्षा घेणारा दिवस ठरला. अवघ्या काही तासांच्या अतिवृष्टीने मुंबईपुणे या राज्याच्या सर्वात महत्त्वाच्या आर्थिक कॉरिडॉरची कनेक्टिव्हिटी विस्कळीत झाली. भूस्खलनामुळे मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक थांबवावी लागली, जुन्या राष्ट्रीय महामार्गावरही परिणाम झाला, तर करजतलोणावळा घाट विभागात दरड कोसळल्याने रेल्वे सेवाही मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–१०७ मंगळवार दि.०७ जुलै २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नाशिक–त्र्यंबकेश्वरमध्ये आज ढगफुटीचा इशारा

मुंबई : नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी अत्यंत चिंतेची आणि मोठी बातमी समोर येत आहे. मंगळवारी दि.७ रोजी या भागात तीव्र ढगफुटी होण्याची दाट शक्यता असून, एकाच दिवसात तब्बल ३०० मिमी इतका विक्रमी पाऊस कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: याबाबतची माहिती देत नाशिक जिल्ह्याला सर्वात महत्त्वाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे ॲक्शन मोडवर आली आहे. नाशिकमधील संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ७ जुलै रोजी सर्वात महत्त्वाचा अलर्ट नाशिकला आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात ढगफुटी संभावित आहे. त्या प्रकारचे निर्देश आपल्याला प्राप्त झालेले आहेत. ही मोठी ढगफुटी असू शकते, जवळपास ३०० मिमी पाऊस ढगफुटीमुळे या भागात होऊ शकतो. नाशिकच्या बऱ्याच मोठ्या भागात ढगफुटी होऊ शकते, त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने तयारी केलेली आहे. नाशिक शहर किंवा नाशिक जिल्हा या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे ढगफुटीमुळे जी परिस्थिती निर्माण होऊ शकते, त्याची पडताळणी करून बऱ्याचशा उपायोजना करण्यात आलेल्या आहेत.

### भारताच्या उपस्थितीबद्दल इराणकडून आभार

तेहराण : इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. यामध्ये जगभरातील विविध देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले. भारतानेही आपले प्रतिनिधी पाठवले होते. आता यावर इराणची प्रतिक्रिया आली असून, इराणने याबद्दल भारताचे आभार मानले आहेत. भारतातील इराणी दूतावासाने (ट्विटर) वर केलेल्या एका पोस्टमध्ये, भारताच्या या उपस्थितीला परस्पर आदराची एक शक्तीशाली अभिव्यक्ती म्हटले आहे. भारतातून गेलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने तेहरानमध्ये इराणच्या माजी सर्वोच्च नेत्यांना श्रद्धांजली वाहिली. या शिष्टमंडळात बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन आणि परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गरीटा यांचा समावेश होता. या दोघांशिवाय काँग्रेस नेते सलमान खुर्शीद, जम्मू–काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती या देखील या गटात सामील होत्या.

### उग्रवाद्यांचा घातकी हल्ला; दोन जवान शहीद

दिल्ली : मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात आसाम रायफल्सचे दोन जवान शहीद झाले. एक जखमी झाला. मणिपूरच्या राज्यपालांनी या हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केले आणि त्याचा निषेध केला. हल्ल्यानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे. परिसर सील करण्यात आला आहे. लष्कर एक मोठी शोधमोहीम सुरू करीत आहे. राजभवनातून जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'उखरुलमध्ये झालेल्या हल्ल्यात आसाम रायफल्सच्या दोन शूर जवानांच्या झालेल्या दु:खद हौतात्म्यामुळे मणिपूरचे राज्यपाल अत्यंत व्यथित झाले आहेत. राज्यपाल या भ्याड हिंसक कृत्याचा निषेध करतात. अशा हल्ल्यांना आपल्या समाजात स्थान नाही. शांतता आणि सुरक्षा राखण्याचा आपला सामूहिक निर्धार ते कमकुवत करू शकत नाहीत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ५७.५० क्विंटल | | |
| २,३९० | २,६९१ | २,५२० |
| ज्वारी/हायब्रिड : ३५.०० क्विंटल | | |
| २,३०० | ३,३०० | २,५६६ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | | |
| २,२२६ | २,२२६ | २,२२६ |
| तूर : १३.५० क्विंटल | | |
| ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | | |
| ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: ५७.५० क्विंटल | | |
| २,३०० | २,८३२ | २,६०९ |
| मुग: ४.०० क्विंटल | | |
| ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | | |
| ५,५०० | ५,५५२ | ५,५२६ |

# खतांच्या लिंकिंगला राज्यात बंदी

## लिंकिंग करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईचे संकेत; कृषिमंत्र्यांची विधानपरिषदेत माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर रासायनिक खतांच्या विक्रीत सुरू असलेल्या लिंकिंग (सक्तीची जोडविक्री) प्रकारावर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. शेतकऱ्यांना अनुदानित खतांसोबत विना–अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते किंवा जैवउत्तेजके सक्तीने खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारींवरून विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यात खतांच्या लिंकिंगला स्पष्टपणे मनाई असल्याचे सांगत, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतल्याची माहिती दिली.**




विधानपरिषदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नात खतांच्या लिंकिंग पद्धतीमुळे सुमारे ९० टक्के प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना आवश्यक असलेले अनुदानित खत मिळवण्यासाठी इतर महागडी उत्पादने सक्तीने खरेदी करावी लागत असल्याने त्यांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच दोषी कंपन्या व विक्रेत्यांवर कारवाई करून खतांच्या काळ्या बाजाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.यावर कृषिमंत्री भरणे यांनी लेखी उत्तरात सांगितले की, कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र फर्टिलायजर्स, पेस्टीसाईडस्, अँड सीडस्, डिलर्स असोसिएशनने २७ ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत बेमुदत आंदोलन केले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासन आणि विक्रेते संघटनांमध्ये बैठक घेण्यात आली. बैठकीत खत उत्पादक कंपन्यांकडून अनुदानित खतांच्या पुरवठ्यासोबत इतर उत्पादनांची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारींवर सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत लिंकिंग पद्धत बंद करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आल्याने विक्रेत्यांनी २९ एप्रिल रोजी आंदोलन मागे घेतल्याचे कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर शासनाने या विषयावर धोरणात्मक निर्णय घेत राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी पुढील कारवाई सुरू केली.ङ्खखरीप हंगामात खतांचा पुरवठा सुरळीत राहावा आणि शेतकऱ्यांना आवश्यक खते कोणत्याही सक्तीशिवाय उपलब्ध व्हावीत, यासाठी उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश ◀◀ पान २ वर

# एमपीएससी कडून होणारी परीक्षा ऑफलाइन घ्या–आ.रोहित पवार

## शासनाने मागण्या मान्य न केल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा



छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**विद्यार्थी व स्पर्धा परीक्षेचे तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी आज छत्रपती संभाजीनगर येथे भव्य असा एल्गार मोर्चा काढण्यात आला एमपीएससीमार्फत घेतल्या जाणाऱ्या ऑनलाईन परीक्षा रद्द करून ऑफलाईन परीक्षा घेण्यात याव्यात यासह विविध मागण्यासाठी काढण्यात आलेल्या आजच्या एल्गार मोर्चामध्ये रोहित पवार यांनी महाराष्ट्र शासनाला इशारा दिला आहे.**

'महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कृती समिती'च्यावतीने छत्रपती संभाजीनगरमध्ये विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आयोजित केलेल्या आंदोलनाला उपस्थित राहून संबोधित केलं आणि त्यांच्या या आंदोलनाला पाठींबा दिल एमपीएससी कडून होणारी ऑनलाईन परीक्षापद्धत रद्द करून पुन्हा पूर्वीप्रमाणे ऑफलाईन परीक्षा घेण्यात यावी, पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा करावा, नॉर्मलायझेशनची पद्धत रद्द करावी, शिक्षकांसाठीच टीईटी रद्द करावी, पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवावी तसंच वर्ग कलेल्या ३ आणि ४ च्या पदांच्या भरतीसाठीचा सिलॅबस जाहीर करावा, ◀◀ पान २ वर

# मनोज जरांगे यांना जीवे मारण्याची धमकी

## व्हायरल ऑडिओ क्लीपने खळबळ

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. सरपंच देशमुख आणि नंतर विलास घुले हत्या प्रकरणानंतर आधीच राजकीय वातावरण ढवळून निघाले असताना, आता एका फोन कॉलच्या ऑडिओ क्लिपमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या कॉल रेकॉर्डिंगमध्ये एका व्यक्तीकडून मनोज जरांगे पाटील यांना आक्षेपार्ह भाषा वापरत धमकी देण्यात आली आहे. या कॉल रेकॉर्डिंगची कोणतीही पुष्टी साम टीव्ही करत नाही.**



मिळालेल्या माहितीनुसार, विलास घुले हत्या प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलावर गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले. त्यानंतर रमेश घुलेविरोधात दाखल असलेल्या गुन्ह्यांचा मुद्दा तसेच त्याचे वाल्मीक कराड याच्यासोबतचे फोटो यावरून आरोप–प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे यांचे परळीतील समर्थक बाळासाहेब पाथरकर यांनी रमेश घुले यांच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीनंतर एका अज्ञात व्यक्तीने पाथरकर यांना फोन केला. ◀◀ पान २ वर

# भाजपा, आरएसएसच्या विरोधात काँग्रेसचे आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

अयोध्येतील प्रभू रामाच्या मंदिराला रामभक्तांनी लाखो करोडो रुपये दान स्वरुपात दिले. सोने चांदीचे दागिने दिले पण भक्तांनी दिलेल्या दान व देणग्यांवर भाजपा व रा.स्व. संघाच्या लबाड बगलबच्चांनी दरोडा टाकला आहे. हा केवळ पैसे अथवा देणग्यांवर टाकलेला दरोडा नसून, श्रीरामाच्या नावावर कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेवरच टाकलेला दरोडा आहे. रामाला लुटणाऱ्या भाजपा व रा. स्व. संघाच्या दरोडेखोरांना कठोर शासन झाले पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने एल्गार पुकारला असून उद्या मंगळवार दिनांक ७ जुलैपासून राज्यभर आंदोलन केले जाणार आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी नाशिकच्या काळाराम मंदिरात सकाळी ११ वाजता आंदोलनाचा शंखनाद केला जाणार आहे. या आंदोलनात प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, नाशिक ◀◀ पान २ वर

# एकाच पावसात महाराष्ट्र ठप्प, 'आणीबाणी' जाहीर करा!

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मुंबईपुणे महामार्गासह अनेक महत्त्वाचे मार्ग ठप्प झाले आहेत. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीवरून राजकीय वातावरणही तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर जोरदार टीका करत प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.**

राज्यातील विविध भागांत मुसळधार पावसामुळे पूरस्थिती आणि वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. विशेषतः मुंबईपुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' परिसरात दरड कोसळल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याच्या अधिवेशनादरम्यान



विरोधकांकडून सरकारवर टीका वाढली आहे. या परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर अत्यंत आक्रमक शब्दांत निशाणा साधला. त्या म्हणाल्या, ''एवढे मोठे प्रकल्प करताना सरकारने पर्यावरणाचा विचारच केलेला नाही. परिणामी, अवघ्या एका पावसात संपूर्ण महाराष्ट्र ठप्प झाला आहे. सत्ताधारी पक्ष सातत्याने ७० वर्षांचा हिशोब मागतो, मात्र मागील १०१२ वर्षांपासून ◀◀ पान २ वर

# अग्निवीरांना मिळणार कायमस्वरूपी नोकरी?

## नौदल आणि हवाई दलाचा सरकारला प्रस्ताव, भरतीबाबत मोठा निर्णय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अग्निपथ योजनेअंतर्गत भरती झालेल्या अग्निवीरांना चार वर्षांच्या कार्यकाळानंतर नोकरीबाबत पूर्वी चिंता वाटत होती, परंतु आता ही चिंता दूर होण्याची शक्यता आहे. वृत्तानुसार, नौदल आणि हवाई दलाने अग्निवीरांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचा कोटा वाढवण्याचा प्रस्ताव सरकारला सादर केला आहे. ◀◀ पान २ वर

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताहचे आयोजन–सुनिल तटकरे

## राज्यभरात २२ ते २६ जुलै दरम्यान राज्यभराज होणार कार्यक्रम

मुंबई । प्रतिनिधी

**स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरात दिनांक २२ ते २६ जुलै या कालावधीत 'जनसेवा सप्ताहा' चे आयोजन करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.**

आदरणीय अजितदादा म्हणजे अथक परिश्रम दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व निर्णयक्षमता आणि जनतेसाठी अखंड झटणारे नेते शेतकरीकष्टकरी महिला युवक विद्यार्थी यांना त्यांचा आधार होता कृषी सहकार अर्थ उद्योग





आरोग्य शिक्षण क्रीडा पर्यावरण पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास अशा प्रत्येक क्षेत्रात दादांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अथक प्रयत्न केले आहे. जनसेवा सप्ताहाच्या निमित्ताने खालील उपक्रम राबविले जाणार आहेत. दादांनी नेहमीच वृक्ष व पर्यावरण संवर्धनावर भर दिला होता. त्यामुळे प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, आणि शाळा महाविद्यालये यामध्ये 'हरित महाराष्ट्र,वृक्ष माझी सावली, वृक्ष माझी माऊली,' 'दादांची दृष्टी, हरित सृष्टी,' अशा थीम अंतर्गत वृक्षारोपण मोहिम घेतली जाणार आहे. अजितदादांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री देवराई फाऊंडेशन या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात 'देवगिरी ते देवराई' हा वृक्षसंवर्धन उपक्रम राबवला जाणार आहे. याअंतर्गत प्रत्येक लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद आजी माजी सदस्यांनी आपापल्या मतदारसंघात प्रत्येकी एक देवगिरी ते देवराई उभारावी. राज्यव्यापी रक्तदान शिबीरे आयोजित करुन रक्तदान जनजागृती व रक्तसाठा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न. ग्रामीण व शहरी भागात मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिरे, त्यामध्ये मधुमेह, रक्तदाब आणि डोळ्यांच्या तपासणी केल्या जाणार आहेत. महिलांसाठी स्तन कर्करोग, गर्भाशय कर्करोग तपासणी आणि सर्वांसाठी मुख कर्करोग तपासणी व समुपदेशन करावे. महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑस्टीओपोरोसिसचे निदान शिबीरे आयोजित करण्यात आले आहे. अजितदादा ◀◀ पान २ वर

# मुंबईत रेड अलर्ट!

## खासगी कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम, शासकीय कर्मचाऱ्यांना अर्धा दिवस सुट्टी



मुंबई । प्रतिनिधी

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात मुसळंधार पावसाचा धोका लक्षात घेता भारतीय हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. अतिवृष्टीसह ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. त्यानुसार, मुंबईतील ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मुंबई–पुणे ठप्प : एका पावसाने कनेक्टिविटी हरपली

६ जुलै २०२६. महाराष्ट्रासाठी हा दिवस केवळ मुसळधार पावसाचा नव्हता; तो आपल्या विकासाच्या मॉडेलची कठोर परीक्षा घेणारा दिवस ठरला. अवघ्या काही तासांच्या अतिवृष्टीने मुंबईपुणे या राज्याच्या सर्वात महत्त्वाच्या आर्थिक कॉरिडॉरची कनेक्टिव्हिटी विस्कळीत झाली. भूस्खलनामुळे मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक थांबवावी लागली, जुन्या राष्ट्रीय महामार्गावरही परिणाम झाला, तर करजतलोणावळा घाट विभागात दरड कोसळल्याने रेल्वे सेवाही मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली. प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक रोखली, तर बचाव यंत्रणा तातडीने कामाला लागल्या.

परंतु या घटनेकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. कारण हा प्रश्न फक्त पावसाचा नाही; हा प्रश्न आपल्या विकासाच्या संकल्पनेचा आहे. गेल्या दशकभरात महाराष्ट्रात पायाभूत सुविधांवर लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' हा सुमारे ₹६,६९५ कोटींचा प्रकल्प १ मे २०२६ रोजी सुरू करण्यात आला. १३.३ किलोमीटरच्या या नव्या मार्गामुळे प्रवासाचा वेळ २० ते ३० मिनिटांनी कमी होईल, घाटातील धोकादायक वळणांना पर्याय मिळेल आणि वाहतूक अधिक सुरक्षित होईल, असा दावा करण्यात आला होता. याच काळात अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक), मुंबई कोस्टल रोड, पुणे मेट्रो, समृद्धी महामार्ग, पुणे रिंग रोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, पीएम गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवले गेले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांचा स्मार्ट सिटीज मिशनमध्ये समावेश करून स्मार्ट ट्रॅफिक सिग्नल, इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर, सीसीटीव्ही नेटवर्क, ई-गव्हर्नन्स, सार्वजनिक – आणि डिजिटल शहरी व्यवस्थापनावर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला. मात्र प्रश्न असा आहे की, या सर्व गुंतवणुकीनंतरही महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचा आर्थिक कॉरिडॉर एका तीव्र पावसात का ठप्प होतो? या प्रश्नाचे उत्तर केवळ राजकारणात शोधून चालणार नाही. कारण ही समस्या कोणत्याही एका सरकारची नाही. अनेक दशकांपासून वेगवेगळ्या सरकारांनी या मार्गाचा विस्तार, सुधारणा आणि आधुनिकीकरण केले आहे. त्यामुळे ही चर्चा दोषारोपांची नसून धोरणात्मक आत्मपरीक्षणाची असली पाहिजे. विशेष म्हणजे, उद्घाटनानंतर अवघ्या नऊ आठवड्यांतच 'मिसिंग लिंक' परिसरात भूस्खलन झाल्याने वाहतूक प्रभावित झाली. त्याआधी रस्त्याच्या काही भागांवर खड्ड्यासदृश दोष आढळल्याच्या बातम्याही समोर आल्या. याचा अर्थ प्रकल्प निकृष्टच आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. अतिवृष्टी, सह्याद्रीचा भूभाग, नैसर्गिक भूगर्भीय हालचाली आणि हवामान बदल यांचाही यात मोठा वाटा असू शकतो. मात्र इतक्या मोठ्या सार्वजनिक गुंतवणुकीनंतर काही प्रश्न विचारणे अत्यावश्यक आहे. हवामान बदलामुळे वाढणाऱ्या अतिवृष्टीचा विचार डिझाइनमध्ये पुरेसा झाला होता का? ड्रेनेज व्यवस्था अपेक्षेप्रमाणे कार्यरत होती का? उतारांच्या स्थिरतेचे स्वतंत्र ऑडिट झाले होते का? मान्सूनपूर्व तपासणी कितपत प्रभावी होती? या प्रश्नांची उत्तरे पारदर्शकपणे देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आज 'स्मार्ट सिटी' या संकल्पनेचाही नव्याने विचार करण्याची गरज आहे. स्मार्ट शहर म्हणजे केवळ डिजिटल स्क्रीन, मोफत – , मोबाईल ॲप्स किंवा सीसीटीव्ही कॅमेरे नव्हेत. स्मार्ट शहर म्हणजे संकटाच्या काळातही नागरिकांचे जीवन सुरळीत ठेवणारी व्यवस्था. रस्ता बंद झाला तर पर्यायी मार्ग तत्काळ उपलब्ध होणे, रेल्वे विस्कळीत झाली तर पर्यायी वाहतूक सक्षमपणे उभी राहणे, पूरस्थितीतही आपत्कालीन सेवा कार्यरत राहणे आणि माहितीचे प्रभावी व्यवस्थापन होणेही खरी स्मार्टनेसची व्याख्या आहे. भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनत आहे. महाराष्ट्र हा त्या वाढीचा प्रमुख आधार आहे. मुंबईपुणे आर्थिक पट्टा हा उद्योग, आयटी, ऑटोमोबाईल, शिक्षण, वित्तीय सेवा आणि स्टार्टअप्सचा कणा मानला जातो. या मार्गावरील प्रत्येक तासाच्या अडथळ्याचा परिणाम उद्योगांच्या पुरवठा साखळीवर, निर्यातीवर, कर्मचाऱ्यांच्या प्रवासावर आणि अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेची लवचिकता ही आता आर्थिक गरज बनली आहे. आज हवामान बदल हे वास्तव आहे. भारतीय हवामान विभाग गेल्या काही वर्षांपासून अतिवृष्टीच्या वाढत्या घटनांबाबत सातत्याने इशारे देत आहे. त्यामुळे विकासाचे निकषही बदलले पाहिजेत. शंभर वर्षांपूर्वीच्या पर्जन्यमानावर आधारित डिझाइन आज पुरेसे राहणार नाही. भविष्यातील हवामान लक्षात घेऊन रस्ते, पूल, बोगदे, रेल्वे, नाले आणि शहरी जलनिस्सारण यांचे पुनर्मूल्यांकन करावे लागेल.आजचा प्रश्न असा नाही की विकास व्हावा की नाही. विकास आवश्यकच आहे. प्रश्न एवढाच आहे की विकास किती टिकाऊ आहे? आपण फक्त वेगवान महामार्ग उभारत आहोत, की संकटातही टिकणारे महामार्ग? आपण फक्त स्मार्ट सिटी उभारत आहोत, की हवामान-प्रतिरोधक शहरे उभारत आहोत? एका पावसाने मुंबई आणि पुणे यांच्यातील संपर्क खंडित होणे ही केवळ वाहतुकीची समस्या नाही; ती नियोजन, शहरी व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांच्या गुणवत्तेची गंभीर कसोटी आहे. या घटनेतून जर आपण योग्य धडा घेतला, तर भविष्यातील विकास अधिक सक्षम होईल. पण जर प्रत्येक मान्सूननंतर आपण त्याच समस्या, त्याच घोषणा आणि त्याच आश्वासनांमध्ये अडकून राहिलो, तर 'स्मार्ट सिटी' ही संकल्पना कागदावरच राहील आणि नागरिकांच्या मनात एकच प्रश्न कायम राहील ''हजारो कोटींच्या विकासानंतरही, एका पावसाने महाराष्ट्राची जीवनवाहिनी का थांबते?

# रस्त्याच्या मागणीसाठी रहिवाशांचा मुख्य रस्त्यावर ठिय्या; प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

**जालना । प्रतिनिधी**

**शहरातील महानगरपालिका हद्दीतील सोरटीनगर, मयुरी पार्क आणि कृष्णबन सोसायटी या परिसराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने संतप्त रहिवाशांनी सोमवारी दुपारी जालनाछत्रपती संभाजीनगर महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. अखेर महानगरपालिका प्रशासन, पोलिस आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मध्यस्थीनंतर रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आल्याने नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.**

गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरातील रहिवाशांना मूलभूत सुविधांच्या अभावाचा सामना करावा लागत आहे. शहराच्या मध्यवस्तीत तसेच रत्नप्रभा मोटर्सलगत असलेल्या मयुरी पार्क, कृष्णबन सोसायटी आणि सोरटीनगर या वसाहतींना जोडणारा रस्ता अत्यंत खराब झाला असून, अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालक, पादचारी आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावर अपघातांचे प्रमाणही वाढले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्याच्या दुरुस्ती व नव्याने बांधकामासाठी रहिवाशांनी वेळोवेळी महानगरपालिका प्रशासन, संबंधित नगरसेवक तसेच लोकप्रतिनिधींना निवेदने दिली. अनेकदा प्रत्यक्ष भेटूनही रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला नाही. त्यामुळे अखेर संतप्त नागरिकांनी सोमवारी दुपारी सुमारे दोन वाजता जालनाछत्रपती संभाजीनगर या मुख्य मार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केले. आंदोलनामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले. त्याचवेळी महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली.



रस्त्याचा विषय महापालिकेच्या बैठकीत प्राधान्याने मांडून लवकरात लवकर काम सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. परिसरातील अनेक नागरिक विविध खासगी कंपन्या तसेच नव्या एमआयडीसी परिसरात नोकरीसाठी ये-जा करतात. खराब रस्त्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत आहे. पावसामुळे चिखल आणि पाण्याने भरलेल्या खड्ड्यांमधून मार्ग काढताना दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत असून, महिला व ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही दररोज जीव मुठीत धरून या मार्गाने प्रवास करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, महानगरपालिका नियमितपणे मालमत्ता कर वसूल करत असली तरी रस्ता, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधा पुरविण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. शहरातील इतर भागात विकासकामे होत असताना या परिसराकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या परिसरात राहायला आल्यानंतर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर झाले. शहरातील अनेक भागांत रस्ते, पाणी व वीज यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या; मात्र आमच्या परिसरात आजही रस्ता आणि पाण्याची सुविधा नाही. त्यामुळे आम्ही शहरात राहतो की एखाद्या खेड्यात, असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्याचे काम सुरू केले नाही, तर लवकरच महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल.'' ''महानगरपालिका आमच्याकडून नियमित कर आकारणी करते; मात्र नागरिकांना सुरक्षित रस्ताही उपलब्ध करून देऊ शकत नाही. शहरापासून दूर असलेल्या अनेक वसाहतींमध्ये रस्ते व पाण्याची सुविधा आहे; मात्र आमच्या परिसरात रस्ता, पाणी आणि वीज या तिन्ही मूलभूत सुविधांची गंभीर समस्या आहे. याकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.'' ''पावसाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना शाळेत नेणे-आणणे अत्यंत कठीण झाले आहे. चिखलामुळे महिला दुचाकीस्वार वारंवार घसरून पडत आहेत. रस्ता, वीज आणि पाणी या सुविधा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर महिलांसह महानगरपालिकेच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल

# कृतज्ञतेचे शास्त्रीय आणि जनुकीय महत्त्व : आरोग्यदायी जीवनशैलीचा पाया-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**कृतज्ञता व्यक्त करणे ही केवळ संस्कारांची किंवा सामाजिक शिष्टाचाराची बाब नसून ती मानवी मेंदू, मानसिक आरोग्य आणि शरीराच्या जैविक कार्यप्रणालीवर सकारात्मक परिणाम करणारी वैज्ञानिक प्रक्रिया असल्याचे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे यांनी व्यक्त केले. नियमितपणे कृतज्ञता व्यक्त करण्याची सवय तणाव कमी करण्यास, मानसिक संतुलन राखण्यास तसेच सकारात्मक जीवनशैली विकसित करण्यास मदत करते, असे त्यांनी सांगितले.**

डॉ. टेकाळे यांच्या मते, कृतज्ञता व्यक्त करताना मेंदूमध्ये विविध सकारात्मक न्यूरोट्रान्समीटरचे स्रवण वाढते. त्यामुळे आनंद, समाधान, आत्मविश्वास आणि सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात. काही संशोधनांमध्ये कृतज्ञतेच्या सरावामुळे तणाव कमी होणे, झोप सुधारणे आणि मानसिक आरोग्याला फायदा होणे दिसून आले आहे. तसेच, दीर्घकालीन सकारात्मक मानसिक वातावरणामुळे एपिजेनेटिक प्रक्रियांवरही परिणाम होऊ शकतो; मात्र विशिष्ट जनुकांमध्ये नेमके कोणते बदल होतात याबाबत अद्याप संशोधन सुरू आहे. ईश्वराप्रती कृतज्ञता : श्रद्धा आणि कृतज्ञतेच्या भावनेमुळे मेंदूमध्ये डोपामाइनचे प्रमाण वाढण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे आनंदाची भावना निर्माण होते आणि तणाव कमी होण्यास हातभार लागतो. निसर्ग आणि पंचतत्त्वांप्रती कृतज्ञता : निसर्गाशी जोडलेले राहणे आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे



यामुळे तणावाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे शरीरातील जैविक घड्याळ आणि रोगप्रतिकारक शक्तीवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. आई-वडिलांप्रती आदर आणि कृतज्ञता : पालकांविषयी आदर व कृतज्ञतेची भावना मानसिक सुरक्षितता आणि भावनिक स्थैर्य वाढवते. सकारात्मक कौटुंबिक वातावरणामुळे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. मित्रांप्रती कृतज्ञता : मित्रांचे योगदान मान्य करून त्यांचे आभार मानल्याने परस्परांतील विश्वास वाढतो. यामुळे सामाजिक नाती अधिक मजबूत होतात आणि भावनिक बुद्धिमत्ता विकसित होण्यास मदत होते. पती-पत्नीमधील कृतज्ञता : जोडीदाराचे आभार मानण्याची सवय नात्यातील संवाद आणि विश्वास वाढवते. प्रेम, जिव्हाळा आणि भावनिक जवळीक निर्माण होण्यास ऑक्सिटोसिनसारख्या हार्मोन्सची भूमिका महत्त्वाची मानली जाते. मुलांचे कौतुक : मुलांचे योग्य वेळी कौतुक आणि प्रोत्साहन केल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढतो. सकारात्मक वातावरणामुळे त्यांच्या बौद्धिक आणि भावनिक विकासाला चालना मिळते. समाजाप्रती कृतज्ञता : समाजाचे ऋण मानणे, सामाजिक बांधिलकी जपणे आणि इतरांच्या मदतीबद्दल आभार व्यक्त करणे यामुळे सकारात्मक भावना निर्माण होतात आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते. आरोग्यदायी जीवनशैलीचा पाया डॉ. टेकाळे यांनी सांगितले की, कृतज्ञतेची सवय व्यक्तीच्या विचारांमध्ये सकारात्मकता निर्माण करते. त्यामुळे राग, मत्सर आणि तणाव कमी होऊन शांतता, नम्रता आणि परिपक्वता वाढते. परिणामी जीवन अधिक आनंदी, अर्थपूर्ण आणि संतुलित बनते. त्यांच्या मते, कृतज्ञतेमुळे डोपामाइन, सेरोटोनिन, ऑक्सिटोसिन आणि एंडोर्फिन यांसारख्या सकारात्मक न्यूरोट्रान्समीटरच्या कार्यात वाढ होण्यास मदत होऊ शकते, तर तणावाशी संबंधित कोर्टिसोलचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागू शकतो. त्यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे (एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार, गोल्ड मेडलिस्ट) हे न्युरो-सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ आणि सेक्सोलॉजिस्ट असून ते दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड येथील साई क्लिनिक, गावते कॉम्प्लेक्स, डी.पी. रोड, डॉक्टर लाईन, बसस्थानकाच्या पाठीमागे येथे रुग्णसेवेसाठी उपलब्ध असतात.

# पांजरापोळ गौशाळेत संत मुक्ताई पालखीचा विसावा!

## हजारो भाविकांनी दर्शनासह घेतला प्रसाद

**जालना । प्रतिनिधी**

**विठ्ठल,,विठ्ठल,,जय हरी, विठ्ठल..., ज्ञानोबा..,माऊली तुकाराम ...,मुक्ताई,,मुक्ताई..., असा हरिनामाचा गजर करत आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे निघालेल्या संत मुक्ताई च्या पालखी चे रविवारी ( ता. ०५) सकाळी रिंगण सोहळ्यानंतर पांजरापोळ गौशाळेत आगमन झाले. वारकऱ्यांच्या सेवेत साडेचार दशकांची परंपरा कायम राखत यंदाही गौशाळेच्या विश्वस्तांनी उत्साह आणि भक्तीमय वातावरणात पालखी चे स्वागत करून वारकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था केली. हजारो भाविकांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.**



श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पालख्यांमध्ये मानाचे स्थान असलेल्या मुक्ताईच्या पालखी सोहळ्यास ३१७ वर्षांची परंपरा आहे.मागील ४७ वर्षांपासून पांजरापोळ गोशाळेत पालखीच्या भोजनाची व्यवस्था केली जाते. मुक्ताईनगर येथून विविध रंगांच्या फुलांनी सजवलेल्या पालखीत संत मुक्ताई चा मुखवटा,०२ अश्व ,०६ बैल,हातात भगवी पताका, टाळ- मृदंग घेऊन हरिनामाचा गजर करणारे १८०० महिला व वारकरी सहभागी झाले आहेत.खानदेश, विदर्भानंतर जालना शहरात शनिवारी मुक्काम झाला. रविवारी सकाळी जे.ई.एस.महाविद्यालयात रिंगण सोहळ्यानंतर पांजरापोळ गौशाळा परिसरात आगमन होताच अध्यक्ष उद्योजक घनश्यामदास गोयल, कोषाध्यक्ष विजयकुमार कामड,उपाध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, सचिव कैलास बियाणी, नगरसेविका स्नेहलता कामड, उद्योजक गोपाल गोयल, सौ शिखा गोयल ,प्रा. सत्संग मुंडे ,यांनी विधीवत पूजन करून त्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी दिंडीत सहभागी दोन हजार वारकरी आणि दर्शनास आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी अध्यक्ष घनश्यामदास गोयल,कोषाध्यक्ष विजयकुमार, यांच्यासह महिला व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पांजरापोळ गोशाळेत संत मुक्ताई च्या पालखीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष घनश्यामदास गोयल, कोषाध्यक्ष विजयकुमार कामड,उपाध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, सचिव कैलास बियाणी, नगरसेविकास स्नेहलता कामड , उद्योजक गोपाल गोयल, सौ शिखा गोयल, प्रा.सत्संग मुंडे आदी दिसत आहेत.

# पान १ वरून...

## खतांच्या लिंकिंगला

सरकारने जारी केलेल्या आदेशांचा अभ्यास करण्यात आला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने २० मे २०२६ रोजी महत्त्वाचा आदेश जारी केला. या आदेशानुसार राज्यातील अनुदानित खतांचे उत्पादक व पुरवठादार कंपन्यांना देण्यात आलेल्या परवान्याअंतर्गत अनुदानित रासायनिक खतांशिवाय इतर विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके किंवा तत्सम उत्पादनांचा पुरवठा अथवा विक्री अनुदानित खतांशी जोडून करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता अनुदानित खतांच्या पुरवठ्यासोबत इतर उत्पादनांची सक्ती केल्यास संबंधित कंपन्या आणि विक्रेत्यांवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक तेवढीच खते खरेदी करण्याचे स्वातंत्र्य मिळणार असून, सक्तीच्या जोडविक्रीमुळे होणारी आर्थिक लूट रोखण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच खतांचा कृत्रिम तुटवडा, काळाबाजार आणि अनावश्यक उत्पादनांची सक्ती यावरही प्रभावी नियंत्रण मिळविण्यास शासनाला मदत होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

------------

## मनोज जरांगे यांना

फोनवरील संभाषणादरम्यान संबंधित व्यक्तीने मनोज जरांगे यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्दांचा वापर करत शिवीगाळ केली इतकंच नाही तर, 'त्या चौथी पास जरांगेला तर गोळी मारायला लागतेय'' अशी धमकी सुद्धा दिली. ही ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या प्रकरणामुळे बीडमधील राजकीय वातावरण आणखी ढवळून निघाले असून समर्थक आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. मात्र, व्हायरल होत असलेल्या ऑडिओ क्लिपची अधिकृतरित्या पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन सत्य समोर यावे येणे महत्त्वाचं आहे.

-----------

## एमपीएससी कडून होणारी परीक्षा

वेगवेगळ्या परिक्षांसाठी वेगवेगळं शुल्क न आकारता एकच शुल्क आकारण्यात यावं आदी मागण्या आंदोलक विद्यार्थ्यांच्या आहेत. या सर्व मागण्यांसाठी सरकारकडं वारंवार निवेदन देऊन, प्रत्यक्ष भेटून आणि विधानसभेतही याबाबत आवाज उठवला आहे. परंतु सरकार दुर्लक्ष करत असल्याने शेवटी आज संभाजीनगरमध्ये रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला. १२ जुलैपर्यंत या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर त्यानंतर यापेक्षाही अधिक मोठं आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलनानंतर विभागीय आयुक्तांना मागण्यांचं निवेदन देण्यात आलं, अपेक्षा आहे की सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेईल. आम्ही मात्र सदैव विद्यार्थ्यांच्या हितासाठी कायम लढत राहू...! यावेळी प्रा. विठ्ठल कांगणे सर, प्रा. नितेश कराळे सर, कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजित दिपके, रविकांत जी तुपकर, रविराज साबळे पाटील, संतोष मगर, दीपक केदार, युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, मा.आ.सुनील भुसारा, मा. आ.नरेंद्र काळे, मा. आ. संजयभाऊ वाकचौरे, पंकजनाना बोराडे, अतुल गावंडे, सिद्धू लोमटे, यांच्यासह विद्यार्थ्यांसाठी काम करणारी अनेक मान्यवर मंडळी आणि राज्यभरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

## अग्निवीरांना मिळणार

सध्या, अग्निवीर म्हणून भरती झालेला जवान चार वर्षांच्या कालावधीसाठी देशाची सेवा करतो. या कार्यकाळानंतर, केवळ २५ टक्के अग्निवीरांना कायमस्वरूपी नोकरी दिली जाते. मात्र, या धोरणात लवकरच बदल होऊ शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदल आणि हवाई दलाने सरकारला हा कोटा वाढवण्याचे सुचवले आहे. लष्कर आणि हवाई दलाने हा कोटा २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव दिला आहे, तर नौदलाने तो २५ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची सूचना केली आहे. अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीचा कार्यकाळ या वर्षाच्या अखेरीस संपणार आहे. चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर, सर्व अग्निवीरांना सेवेतून मुक्त केले जाईल. त्यानंतर, ज्यांना स्वेच्छेने सशस्त्र दलात सेवा सुरू ठेवायची आहे त्यांना संधी दिली जाईल; त्यापैकी ठराविक जणांना गुणवत्तेच्या आधारावर नियमित सैनिक म्हणून पुन्हा सेवेत सामावून घेतले जाईल. सशस्त्र दलांचे असे म्हणणे आहे की, चार वर्षांच्या कालावधीत या सैनिकांनी शस्त्रे हाताळण्याचा आणि शत्रूचा सामना करण्याचा अनुभव मिळवला आहे. अशा कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवल्यास भारतीय सशस्त्र दलांना फायदा होईल.

**अग्निपथ योजना...**

अग्निपथ योजना हा भारत सरकारने तरुणांना सशस्त्र दलांमध्ये (लष्कर, नौदल आणि हवाई दल) भरती करण्यासाठी सुरू केलेला एक उपक्रम आहे. ही योजना १६ जून २०२२ रोजी सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत भरती झालेल्या तरुणांना अग्निवीर म्हटले जाते. अग्निवीरांची भरती चार वर्षांच्या कालावधीसाठी केली जाते; या कालावधीत सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाचाही समावेश असतो.

-------------

## एकाच पावसात महाराष्ट्र

सत्तेत असलेल्या सरकारच्या कामाचा हिशोब कोण देणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सोमवारी सकाळी सुप्रिया सुळे यांनी महापालिकेला भेट देऊन सुरू असलेल्या आपत्कालीन कामांचा आढावा घेतला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी पुणेमुंबई कनेक्टिव्हिटी पूर्णपणे ठप्प होणे ही गंभीर बाब असल्याचे सांगितले. ''हे सरकार स्वतःला इन्फ्रास्ट्रक्चरचे सरकार म्हणवते, पण नागरिकांची सुरक्षा आणि पर्यावरणाचा विचारच होत नाही,'' असे त्या म्हणाल्या. त्यांनी नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले तसेच राज्यात तातडीने 'आपत्कालीन स्थिती' (एमर्जन्सी) घोषित करण्याची मागणी केली. मुंबईपुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाबाबत बोलताना सुळे यांनी प्रकल्पाच्या कामकाजावरही प्रश्न उपस्थित केले. त्या म्हणाल्या, ''प्रकल्पाचे व्हिडिओ पाहिल्यावर सुरुवातीला ते एआयने तयार केलेले आहेत का, असा संशय आला. पण प्रत्यक्षात परिस्थिती अतिशय गंभीर आहे.'' त्यांनी पुढे म्हटले की, मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करूनही कामात विसंगती दिसत आहे. या प्रकल्पाच्या खर्चाचे ऑडिट झाले आहे का, याची चौकशी व्हावी आणि संपूर्ण कामाची पारदर्शक तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. मुसळधार पावसामुळे राज्यातील परिस्थिती गंभीर बनली असताना राजकीय आरोपप्रत्यारोपही तीव्र झाले आहेत. दुसरीकडे 'मिसिंग लिंक'सारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांवरून सरकारच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

--------

## भाजपा, आरएसएसच्या

शहर काँग्रेस अध्यक्ष निलेश ऊर्फ बब्लू खैरे, नाशिक ग्रामीण उत्तरचे जिल्हाध्यक्ष रमेश कहांडोळे, दक्षिणचे जिल्हाध्यक्ष भरत टाकेकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ९ जुलै ते १४ जुलै दरम्यान राज्यभर सर्व जिल्ह्यात 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह केला जाणार आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी राम मंदिर, शिव मंदिर अथवा हनुमान मंदिरात हा सत्याग्रह केला जाणार आहे. ''मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामाच्या नावावर पैसे खाणाऱ्या भाजपा, आरएसएसच्या लबाड लोकांना सुबुद्धी दे'', अशी प्रार्थनाही यावेळी देवाकडे केली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

-------------

## मुंबईत रेड अलर्ट!

सर्व खासगी कार्यालयांनी शक्य असेल तेथे कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमची सुविधा द्यावी, असे सांगण्यात आले आहे. मुसळधार पाऊस आणि वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, अत्यावश्यक सेवा वगळता सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना दुपारनंतर अर्धा दिवसाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे कार्यालयीन वेळेत होणारी गर्दी कमी होऊन कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे घरी पोहोचता यावे, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मुंबईत अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असून काही ठिकाणी पाणी साचणे, झाडे पडणे आणि वाहतुकीचा वेग मंदावल्याच्या घटना समोर आल्या आहेत.


-----------

## अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त

शिस्तप्रिय व स्वच्छतेचे भोक्ते होते. यामुळेच या जनसेवा सप्ताहात ठिकठिकाणी सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये गडकिल्ले, महापुरूषांची स्मारके, स्थळे, एसटी बस स्थानक आदी तर वारीसोबतच्या अजितदादांच्या स्मृती वारकऱ्यांच्याप्रती चिरंतन रहाव्यात यासाठी आषाढी वारीमध्ये वारकरी सेवा उपक्रम राबविला जाणार आहे. दादांच्या सामाजिक समावेशकतेच्या विचारधारेला प्रोत्साहन देणारे महिलांसाठी राज्यस्तरीय मेळावे, यामध्ये महिला बचत गट सक्षमीकरण, आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण आणि स्वयंरोजगार यावर चर्चा, संवाद व मार्गदर्शन कार्यक्रम, महिलांना सूक्ष्म कर्ज, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्वासाठी मार्गदर्शन, पक्षाच्या महिला आघाडी मार्फत अजितदादा महिला सशक्तिकरण पुरस्कार दिला जाणार आहे. शिवाय शेतकरी महिला सन्मानही केला जाणार आहे. जगातील नवीन व सर्वोत्तम तंत्रज्ञानाबाबत दादा माहिती घेऊन त्याचे प्रयोग शेतीत करायचे यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' चा वापर करावा हा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे एआय तंत्रज्ञानावर आधारित कार्यशाळा, कृषी प्रदर्शने, शेतकरी समुपदेशन मेळावे, पीक पध्दती आणि बाजारभाव मार्गदर्शन व फलोत्पादन आणि फुलशेतीबाबत कार्यक्रम, प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी महिला व पुरुष यांना अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार देण्यात यावा. अजितदादांच्या सामाजिक विचारधारेवर पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि नेतृत्वासाठी तयार करण्यासाठी राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या प्रमुख शहरांमध्ये युवा शिबिरे घेतली जाणार आहेत. शिवाय प्रमुख नेत्यांचा नेतृत्वाखाली कार्यशाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी युवांना प्रशिक्षण त्यामध्ये नेतृत्व कौशल्य, प्रचार रणनीती आणि मतदारांशी संवाद आदीचा समावेश असणार आहे. याशिवाय विविध क्रिडा प्रकारात नामांकित व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या आजी-माजी खेळाडूंचा क्रीडा सन्मानाने गौरव व विविध खेळांचे आयोजन केले जाणार आहे. अजितदादांनी अल्पसंख्याक समाजासाठी अनेक योजना आणि उपक्रम हाती घेतले होते अशा अनेक योजनांचा लाभ अल्पसंख्याक समाजाला मिळावा यासाठी सेवा संकल्प शिबिरे आयोजित केली जाणार आहे. या जनसेवा सप्ताहाची जबाबदारी पालकमंत्री व संपर्कमंत्री यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यांनी त्या- त्या ठिकाणी जाऊन जिल्हाध्यक्ष, फ्रंटल व सेलचे पदाधिकारी, तालुका व शहराध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांच्या बैठका घ्यायच्या आहेत असेही खासदार सुनिल तटकरे यांनी काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# बाप सीए, मोठा भाऊ सीए; अर्णवने निवडली वकिलीची स्वतंत्र वाट


**मुंबई । प्रतिनिधी**



वडील डॉ. भारत कऱ्हाड स्वतः सीए आणि मोठा भाऊही सीए. त्यामुळे अर्णवनेही सीए व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती. मात्र, ''मला सीएमध्ये इंटरेस्ट नाही,'' असे स्पष्ट सांगत अर्णवने स्वतःची स्वतंत्र वाट निवडली. इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या अर्णवने सायन्स शाखेतून बीएससी पूर्ण केली. त्यानंतर एमएससी करण्याऐवजी त्याने कायद्याच्या क्षेत्रात जाण्याचा निर्णय घेतला आणि मुंबईतील प्रतिष्ठित गव्हर्नमेंट लॉ कॉलेज येथे एलएल.बी. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्याच्या स्वतंत्र निर्णयाचा आदर करत कुटुंबानेही त्याला अडवले नाही. वक्तृत्व, ड्राफ्टिंगची आवड, विषय समजून घेण्याची क्षमता, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि सामाजिक संवादकौशल्य यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व काहीसे वेगळे घडले आहे. न्यायाधीश होण्याचे स्वप्न घेऊन त्याने कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश केला. नुकताच त्याचा एलएल.बी.चा निकाल जाहीर झाला असून, मुंबईच्या गव्हर्मेंट लॉ कॉलेजमधून त्याने कायद्याची पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. सीए कुटुंबाची पार्श्वभूमी असतानाही स्वतःच्या आवडीचे क्षेत्र निवडून त्याने वकिलीची स्वतंत्र वाट धरली आहे. न्यायाधीश होण्याचे त्याचे स्वप्न आहे. श्री सुधाकर चाटे, सुदेश कोसुंबकर, प्रा शोभा शिंदे, मंगेश खैरनार, डॉ. बालाजी केंद्रे, शेखर परांजपे, गजानन मुळे, सीए वासुदेव यादवाड, प्रा. छाया आबनावे, संपादक बाळासाहेब फड, दिव्या नागरगोजे, आई डॉ. सुवर्णा कराड, डॉ. अनिल लोहार यांच्यासह अनेकांनी अर्णवचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जालना मर्चंट बँकेच्या गुंतवणूकदाराचे पैसे दोन दिवसात मिळणार?–अर्जुन खोतकर

**जालना । प्रतिनिधी**



**अडचणीत सापडलेल्या जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खातेदारांना त्यांचे पैसे मिळण्यातील अडचण दूर झाली असून बँकेला ९३,३६,९९७९४ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. आ. अर्जुनराव खोतकर यांनी विधिमंडळात आवाज उठविल्यामुळे बँकेस हा निधी प्राप्त झाला आहे.**

जालना येथील मर्चंट बँक ही व्यापारी बँक म्हणून प्रसिद्ध आहे. बँकेचे खातेदार व ग्राहकांचे पैसे बँकेत अडकून पडले होते. स्वतःचे पैसे असूनही ते मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे ग्राहक हवालदिल झाले होते. परंतु या संदर्भात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विधिमंडळात आवाज उठविला होता. गुंतवणूकदारांची काहीही चूक नसताना त्यांना त्यांचे हक्काचे पैसे मिळाले पाहिजे, अशी आग्रही मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केली होती. शासनाने या मागणीची दखल घेऊन बँकेस गुंतवणूकदारांच्या क्लेममजुर करण्याच्या सूचना केल्या त्या नुसार ९३ कोटी लाख ९९हजार ७९४ रुपयांचा निधी उपलब्ध झालेत यातून बँकेच्या सुमारे ८० टक्के खातेदारांना त्यांचे पैसे येत्या दोन-चार दिवसात मिळणार आहेत. पाच लाख रुपये पर्यंतची रक्कम उद्यापासूनच ग्राहकांच्या खात्यात जमा होणार आहे. उर्वरित ग्राहकांनाही त्यांचे पैसे लवकरच परत मिळतील, अशी महिती आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.. दरम्यान, अर्जुनराव खोतकर यांनी विधिमंडळात आवाज उठविल्यामुळे ग्राहकांचे पैसे मिळणार असल्याने ग्राहकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ०७ जुलै २०२६
३

थोडक्यात




## सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुले पिंपळगाव मुख्य बाजार आवारात वृक्षारोपण कार्यक्रम दि.०६ जुलै सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. सहकार सप्ताह वर्ष २०२६ अंतर्गत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथे वृक्षारोपण करतांना सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, संचालक अशोकराव डक, वीरेंद्र सोळंके, उद्धवराव नाईकनवरे, दत्तात्रय डाके, मनोज जगताप, संजयजी कचरे, आसाराम घायतिडक,आबा भोसले,नंदकिशोर सजगणे,अमोलराव जाधव,नितीनराव नाईकनवरे, भागवतराव शेजुळ, भगवानराव आगे, प्रभाकरराव होके, कदीर पठाण व सचिव हरिभाऊ सवणे,लेखापाल उद्धव फपाळ व सर्व अधिकारी,कर्मचारी बांधव उपस्थित होते. सहकार सप्ताहानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांची जोपासना करावी, असे आवाहन करण्यात आले.

## शिवाजी पठाडे यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री निधीतून मदत

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेणारे आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नांतून गांधनवाडी (ता. आष्टी) येथील अपघातग्रस्त शिवाजी श्रीराम पठाडे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ६० हजारांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. त्यामुळे पठाडे कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.



शिवाजी श्रीराम पठाडे यांचा गंभीर अपघात झाल्यानंतर आष्टा गटाचे जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर व शहाजी झांबरे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर आमदार धस यांनी तातडीने त्यांना अहिल्यानगर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णावर शस्त्रक्रिया व पुढील उपचारासाठी मोठ्या खर्चाची आवश्यकता असल्याने आमदार धस यांनी आरोग्य विभागाचे कामकाज पाहणारे विकास साळवे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.त्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मंजूर झालेली ६० हजारांची रक्कम थेट साई एशियन हॉस्पिटलच्या खात्यात जमा करण्यात आली. शिवाजी पठाडे यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असून त्यांची प्रकृती सुधारत आहे. वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे उपचाराचा मोठा भार हलका झाल्याने पठाडे कुटुंबाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महायुती सरकार, आमदार सुरेश धस, तसेच आरोग्य विभागाचे समन्वयक विकास साळवे यांचे आभार मानले.उपचारादरम्यान साई एशियन हॉस्पिटलचे संचालक डॉ. सचिन पाडुळे व डॉ. अभय पाटील यांचेही मोलाचे सहकार्य लाभल्याबद्दल कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# 'संविधान वाचवा लोकशाही वाचवा'च्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणले

बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या निर्णयांविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर करण्यात येत असलेल्या कथित दडपशाहीच्या निषेधार्थ तसेच संविधानाने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्यचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि.६ सोमवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंदोलकांनी 'संविधान वाचवा लोकशाही वाचवा', ' हुकुमशाही चालणार नाही चालणार', 'केंद्र सरकार मुर्दाबाद', 'भाजपा सरकार मुर्दाबाद' अशा घोषणा देत सरकारच्या धोरणांचा निषेध व्यक्त केला. त्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह,राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र




फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार आणि महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांना निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी आणि आंदोलन केल्याप्रकरणी सोशलिस्ट डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सरचिटणीस सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्यावर करण्यात आलेल्या जिल्हा हद्दपारीच्या कारवाईमुळे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ व २१ अंतर्गत नागरिकांना मिळालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी),बाळासाहेब मोरे पाटील( प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच), सय्यद सादेक, , प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), बाजीराव ढाकण, डॉ .संजय तांदळे,नितीन सोनावणे(राज्य प्रवक्ता तथथा बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना), हनुमंत घोडके , दत्तात्रय सुरवसे आदी सहभागी झाले.


## ऊसतोड कामगाराच्या कष्टातून घडलेला भारताचा सुवर्णपुत्र पैलवान सुमितकुमार भारस्कर

माजलगाव । प्रतिनिधी

आज प्रत्येक भारतीयासाठी, विशेषतः महाराष्ट्रासावठी आणि बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.बीडच्या मातीत जन्मलेल्या पैलवान सुमितकुमार भारस्कर यांनी २०२६ च्या यु-२० आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ७० किलो फ्री-स्टाइल गटात सुवर्णपदक पटकावून भारताची मान ऊसतोड कामगाराच्या कष्टातून घडलेला भारताचा सुवर्णपुत्र पै सुधीरकुमार भारस्कर ठरला आहे

आज प्रत्येक भारतीयासाठी, विशेषतः महाराष्ट्रासाठी आणि सोलापूर जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.बीडच्या मातीत जन्मलेल्या पैलवान सुमितकुमार भारस्कर यांनी २०२६ च्या यु-२० आशियाई कुस्ती




अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ७० किलो फ्री-स्टाइल गटात सुवर्णपदक पटकावून भारताची मान उंचावली आहे.अंतिम सामन्यात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.या यशामागे केवळ सुमितची मेहनत तर आहेच पण त्यांचे वडील आप्पासाहेब भारस्कर यांचे कष्ट, त्याग आणि जिद्द आहे. ऊसतोड कामगार म्हणून अत्यंत कठीण परिस्थितीत काम करत त्यांनी आपल्या मुलाला मोठे खेळाडू बनवण्याचे स्वप्न पाहिले.आर्थिक अडचणी असूनही त्यांनी सुमितला तब्बल १३ वर्षे घरापासून दूर ठेवून प्रशिक्षणाची संधी दिली. स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलाच्या भविष्यासाठी झटणाऱ्या एका वडिलांच्या संघर्षाला आज सुवर्ण यशाचे फळ मिळाले.पैलवान सुमितकुमार भारस्कर यांनी मिळवलेले हे सुवर्णपदक केवळ त्यांच्या कुटुंबाचे नाही, तर बीड जिल्ह्याचे, महाराष्ट्राचे आणि संपूर्ण भारताचे आहे.त्यांच्या यशाने हे पुन्हा सिद्ध केले आहे की जिद्द, मेहनत आणि कुटुंबाचा त्याग यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते. आप्पासाहेब भारस्कर यांचे स्वप्न आज सत्यात उतरले एका ऊसतोड कामगाराचा मुलगा आशियाई विजेता बनून देशासाठी सुवर्णपदक जिंकतो,ही प्रत्येक मेहनत करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी कथा आहे.

पान ६ वरुन...

### बीड मतदारसंघातील नागरिकांनी

नागरिकाची जबाबदारी असून भविष्यात मतदानाच्या हक्कासह विविध शासकीय प्रक्रियांसाठीही त्याचा लाभ होतो. ते पुढे म्हणाले की, अनेक नागरिक मतदान ओळखपत्राचा उपयोग केवळ मतदानापुरताच असल्याचा समज करून घेतात. प्रत्यक्षात विविध शासकीय कामकाज, ओळख पडताळणी तसेच इतर अनेक प्रक्रियांमध्ये मतदार ओळखपत्र उपयुक्त ठरते. त्यामुळे मतदार यादीतील नाव वगळले जाणार नाही, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. बीएलओ आपल्या घरी आल्यानंतर त्यांना आवश्यक माहिती देऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून भविष्यात कोणतीही गैरसोय किंवा शासकीय कामात अडचण निर्माण होणार नाही, असे आवाहनही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

### चोर पकडला गावकऱ्यांनी

अधिकाऱ्यांनी चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पोलिसांची जबबादारी नेमकी काय-एकनाथ मस्के

चोर पकडण्याची माहिती पोलिसांना दिली त्यावेळेस पोलिसांकडून अत्यंत हलगर्जीपणा दाखवण्यात आला. चोर पकडायचा आम्ही,गस्त घालायची आम्ही आणि आरोपीला ठाण्यातही आम्हीच आणायचे; मग पोलिसांची जबाबदारी नेमकी काय ? संरक्षण यंत्रणाच जर नागरिकांसोबत असं बेजबाबदारपणे वागू लागली तर नागरिकांनी पहायचे कोणाकडे? या चोरी प्रकरणा दरम्यान गंभीर प्रकार घडला असता तर याला जबाबदार कोण? नागरिकांच्या जीवावर बेतल्यावर पोलिसांना घटनेचे गांभीर्य कळणार आहे का? असा सवाल पात्रुडचे माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी व्यक्त केला.

### मतदार पडताळणी

जगताप म्हणाले, ''आज थोडासा वेळ देऊन मतदार पडताळणीची प्रक्रिया पूर्ण केल्यास उद्याच्या अनेक अडचणी सहज टाळता येतील. मतदार यादी अचूक आणि अद्ययावत ठेवणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.'' मतदार पडताळणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास नागरिकांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे संपर्क साधावा. नागरिकांच्या सेवेसाठी शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक सदैव तत्पर असल्याचेही अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले.

### भालचंद्र विद्यालयाचे प्राचार्य

आजबे, विनायकराव माध्यमिक विद्यालय वैद्यकिन्हीचे सचिव, माजी प्राचार्य उद्धव बांगर, डी. बी. चव्हाण, केंद्रप्रमुख दीपक घाटे, लिंबागणेशचे सरपंच बाळासाहेब जाधव, माजी पर्यवेक्षक अंगद हावळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात दीपकदादा घुमरे यांनी स्व. द. बा. घुमरे तात्यांनी रुजविलेल्या भालचंद्र शिक्षण संस्थेच्या शिक्षणरूपी वटवृक्षाचे जतन व संवर्धन करण्यामध्ये प्राचार्य किसन सावंत यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावल्याचे सांगितले. संस्थेची गौरवशाली परंपरा आणि संस्कारांचा वारसा अधिक सक्षमपणे पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्रमुख अतिथी राजकुमार कदम यांनी आपल्या मनोगतात भालचंद्र शिक्षण संस्था ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी आदर्श संस्था असल्याचे सांगत संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य किसन सावंत यांनी आपल्या ३३ वर्षांच्या सेवाकालातील आठवणींना उजाळा देताना भावना व्यक्त केल्या. सेवाकाळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व सहकारी, विद्यार्थी, पालक, संस्था पदाधिकारी आणि हितचिंतकांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. यावेळी त्यांच्या पत्नी शिक्षिका आशा कदम तसेच पुत्र अमित, सुमित आणि कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश आजबे यांनी केले. सूत्रसंचालन मुकुंद मोटे यांनी तर आभार प्रा. ज्ञानेश्वर भोसले यांनी मानले.

## आ.सुरेश आणा धस यांच्या माध्यमातून शिवाजी श्रीराम पठाडे यांना सीएम फंडातून साठ हजार मदत

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातील गोरं गरीबांचे सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून जाणारे नेतृत्व आरोग्यदुत आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून शिफारस मुळे व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय ना .देवेंद्रजी फडणवीस साहेब व महायुतीचे सरकारने आष्टी तालुक्यातील आष्टा गटांचे जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर व शहाजी झांबरे यांनी आ .सुरेश आण्णा धस यांना फोन करुन सांगितले होते आष्टा फाटा शिवाजी श्रीराम पठाडे रा गाधनवाडी यांचा एक्सीडेंट झाला आहे आरोग्य दुत आ सुरेश आण्णा धस यांनी अहिल्या नगर ऍडमिट करुन घ्यायला सांगितले साई एशियन हॉस्पिटल यांच्या उपचार साठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून साठ हजार रपये मदत मिळालेले संबंधित पठाडे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. कुटुंबाला आर्थिक दिलासा,

आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारसंघातील गोरं गरीबांचे सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून जाणारे आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे आमदार श्री .सुरेश आण्णा धस यांनी प्रयत्नशील असतात . श्री शिवाजी श्रीराम पठाडे हॉस्पिटल अहिल्या नगर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत पुढील शास्त्रीय साठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने श्री सुरेश आण्णा धस यांनी त्यानंतर लगेच आ. सुरेश आण्णा धस यांनी आरोग्य विभागचे कामं पाहणारे विकास तात्या साळवे यांना सांगुन या कुटुंबाला मदतीसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत देण्यासाठी सूचना केल्या सदरची कागदपत्रे सादर करुन रक्कम साई एशियन हॉस्पिटल्स अहिल्या नगर यांच्या खात्या वर जमा करण्यात आली पेशंट यशस्वी अपघात शस्त्रक्रिया पार पडली आहे शिवाजी श्रीराम पठाडे यांची प्रकृती सुधारली आहे आर्थिक मदत मिळाल्यामुळे पठाडे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब व महायुतीचे सरकार व आमदार श्री सुरेश आण्णा धस व आभार व्यक्त केले आहे आणि साई एशियन हॉस्पिटल संचालक डॉ सचिन पाडुळे व डॉ अभिय पाटील यांचे सहकार्य लाभले आहे.

## संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील रखडलेले मानधन मिळण्यास सुरुवात डीबीटी, केवायसी व बँक संबंधित अडचणींचे मोठ्या प्रमाणात निराकरण

**गेवराई । प्रतिनिधी**

शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय योजना अंतर्गत विविध कारणांमुळे अनेक लाभार्थ्यांचे मानधन रखडले होते. मागील दोन महिन्यांपासून या प्रकरणांचा आढावा घेऊन तहसील कार्यालय गेवराई च्या वतीने संबंधित लाभार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याने अनेकांना थकीत मानधन मिळण्यास सुरुवात झाली आहे.

बँक खात्याचे केवायसी अपूर्ण असणे, आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न नसणे, डीबीटी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी तसेच इतर प्रशासकीय कारणांमुळे अनेक लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित होते. या समस्यांची दखल घेऊन या कामाचा निपटारा, संबंधित लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरणे निकाली काढण्याचे काम मोठ्या प्रमाणात झाले आहे.

या प्रक्रियेमुळे वयोवृद्ध नागरिक, विधवा महिला, दिव्यांग लाभार्थी तसेच संजय गांधी व श्रावणबाळ योजनांतील अनेक लाभार्थ्यांच्या प्रलंबित मानधनाचा मार्ग मोकळा झाला असून, डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यात अनुदान जमा होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित राहिलेले लाभार्थ्यांचे लवकरच मानधन मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत डीबीटी पोर्टल चे सर्वर व्यवस्थित कधीकधी चालू राहत नसल्याने अडचणी वाढल्या होत्या. या कामात नायब तहसीलदार संजय सोनवणे तसेच पेशकार एस,पूर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश अमलेकर, संबंधित विभागाने लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रयत्न केल्याची माहिती अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केली. यामुळे अनेक निराधार, ज्येष्ठ नागरिक, विधवा व दिव्यांग लाभार्थ्यांना दिलासा मिळाला असून, लाभार्थ्यांचकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## गावची शाळा, गावचा अभिमान ;गावच्या शाळेतून घडतेय उज्वल पिढी -प्रवीण वारे

आष्टी । प्रतिनिधी

''राज्यातील खाजगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच उत्तम संस्कार मिळतात. भारतीय संस्कृती, मूल्ये आणि सामाजिक जाणीवा आजही जिल्हा परिषद शाळांमधून प्रभावीपणे जोपासल्या जात आहेत,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार २०२६ प्राप्त युवा उद्योजक प्रवीण वारे यांनी केले.



आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने नुकताच अहमदनगर येथे त्यांना महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार २०२६ देण्यात आला. मराठवाडाभूषण लोकनेते आमदार सुरेश धस, समाजसेविका डॉ. सुधाताई कांकरिया आणि इम्पल्स हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. संदीप गाडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बेलगावचे शिक्षक प्रवीण मेहेर यांची केंद्रप्रमुखपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला. तसेच म्हसोबा वस्ती शाळेच्या टेकाडे मॅडम, शिक्षक अजय भराटे आणि युवा उद्योजक प्रवीण वारे यांचाही पालकांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

पुढे सत्काराला उत्तर देताना केंद्रप्रमुख प्रवीण मेहेर यांनी पालकांना आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश देण्याचे आवाहन केले. शासनाने इयत्ता सातवीपर्यंत गावपातळीवर मोफत शिक्षणाची उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिली असून, खाजगी शाळांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी ५० ते ६० हजार रुपयांचा खर्च होतो. हा खर्च वाचवून पालकांनी मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक नियोजन करावे, बेलगाव गावात तीन जिल्हा परिषद शाळा कार्यरत असून अंबिकानगर वस्ती शाळेची पटसंख्या पूर्ण झाली आहे. म्हसोबा वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. गावातील सर्व शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकवृंद सर्वतोपरी प्रयत्न करणार असून, त्यासाठी पालक व ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बेलगावचे उपसरपंच ज्ञानेश्वर माऊली पोकळे, शिवश्री दत्ता मारुती पोकळे, सुधीर दिनकर पोकळे, भाऊसाहेब पांडुरंग पोकळे, तानाजी सुभाष पोकळे, दीपक सिताराम पोकळे, दत्ता महादेव पोकळे, बाबासाहेब मच्छिंद्र पोकळे, माजी उपसरपंच सतीश नवनाथ पोकळे, ग्रामपंचायत सदस्य मारुती सरोदे, माजी सरपंच जयसिंग मुकिंदा पोकळे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी रमेश पोकळे, महेश फुलचंद पोकळे, हनुमंत मुकिंदा पोकळे, अक्षय दत्ता पोकळे, अशोक दशरथ पोकळे, चेअरमन नारायण पोकळे, जालिंदर मुकिंदा पोकळे, बाळासाहेब रामभाऊ घाडगे, सतीश रामकिसन पोकळे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक कारभारीभाऊ मुकिंदा पोकळे होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल फुलचंद पोकळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक अजय भराटे यांनी केले.

# 'माफसू'चा नैसर्गिक चारा उत्पादन प्रयोग यशस्वी



पुणे / प्रतिनिधी

पशुपालकांना कमी खर्चात दर्जेदार आणि रसायनमुक्त हिरवा चारा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने (माफसू) तेलंगखेडी येथील पशुपैदास प्रक्षेत्रावर सुरू केलेला नैसर्गिक चारा उत्पादनाचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. या प्रयोगाच्या सकारात्मक निष्कर्षानंतर विद्यापीठांतर्गत कार्यरत सर्व पशुपैदास प्रक्षेत्रांवर नैसर्गिक शेती संच उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मागील विधिमंडळ अधिवेशनादरम्यान तत्कालीन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी 'माफसू'च्या प्रात्यक्षिक फार्मची पाहणी केली होती. त्यावेळी फार्मवरील पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरू शकणाऱ्या काही त्रुटी निदर्शनास आणून देत रसायनमुक्त हिरव्या चाऱ्याच्या उत्पादनासाठी नैसर्गिक शेतीवर आधारित यंत्रणा विकसित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या. त्यानुसार नागपूर, उदगीर, मुंबई, शिरवळ, परभणी आणि अकोला येथील पशुपैदास प्रक्षेत्रांवर नैसर्गिक शेती संच उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. येथे उपलब्ध निधीत आवश्यक सुविधा उभारल्यानंतर गेल्या चार महिन्यांपासून चारा उत्पादन घेतले जात आहे. नैसर्गिक चारा उत्पादनासाठी फार्मवरच सेंद्रिय खत, जिवामृत, बीजामृत आणि घनजीवामृत तयार केले जात आहे. गूळ, बेसन, शेण आदी घटकांचा वापर करून तयार करण्यात येणाऱ्या या जैविक निविष्ठा पाण्यासोबत पिकांना दिल्या जात आहेत. या पद्धतीने आतापर्यंत मक्याची तीन आणि ज्वारीची दोन पिके यशस्वीपणे घेण्यात आली आहेत. जमिनीची सुपीकता वाढविणे, रसायनमुक्त व दर्जेदार चाऱ्याची उपलब्धता निर्माण करणे आणि पशुपालकांसमोर कमी खर्चातील आदर्श चारा उत्पादनाचे मॉडेल उभे करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रयोगामुळे चारा उत्पादनाचा खर्च सुमारे ५० टक्क्यांनी कमी झाला असून उत्पादनात २० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## शेवग्याच्या शेतीसोबत पानांच्या पावडरचाही व्यवसाय देतो मोठे उत्पन्न



शेवगा हा गुणकारी आणि औषधी गुणधर्मांनी भरलेला असा वृक्ष आहे. सध्या आरोग्याबाबत लोकांमध्ये जागरूकता वाढल्यामुळे शेवग्याच्या पानांना बाजारात मोठी मागणी आहे. याच कारणामुळे अनेक शेतकरी शेवगा लागवडीकडे वळत आहेत. मात्र फक्त लागवड न करता शेवग्याच्या पानांपासून पावडर तयार केली, तर कमी खर्चात जास्त नफा मिळवता येऊ शकतो. शेवग्याच्या पानांची पावडर तयार करताना काही महत्त्वाचे टप्पे पाळणे गरजेचे असते. यामध्ये पानांची कापणी, स्वच्छता, वाळवणे, दळण आणि योग्य पॅकेजिंग यांचा समावेश होतो. हे सर्व टप्पे नीट आणि स्वच्छतेने पूर्ण केल्यास दर्जेदार पावडर तयार होते.

पावडर करण्याची पद्धत : शेवग्याच्या पानांची पहिली कापणी पेरणीनंतर साधारण ३ ते ४ महिन्यांनी करता येते. त्यानंतर दर ३० ते ४५ दिवसांनी नियमित कापणी करता येते. पाने जमिनीपासून ३० सेंटीमीटर ते १ मीटर उंचीवरून विळा किंवा धारदार चाकूने तोडावीत. कापणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावी. पानांवर दव नसल्याची खात्री करणे महत्त्वाचे आहे.कापलेली पाने शक्य तितक्या लवकर प्रक्रिया केंद्रात पोहोचवावीत. प्रक्रिया केंद्र दूर असल्यास फांद्यांपासून पाने वेगळी करून त्यांची वाहतूक करावी.

कमी अंतरासाठी छिद्र असलेल्या टोपल्या किंवा प्लास्टिक कंटेनर वापरावेत. लांब अंतरासाठी वातानुकूलित वाहनांचा वापर करणे फायदेशीर ठरते.पानांची स्वच्छता हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. शेवग्याची पाने तीन वेळा स्वच्छ पिण्याच्या पाण्याने धुवावीत. पहिल्या धुण्यात धूळ, माती आणि किडी काढाव्यात. दुसऱ्या वेळेस १ टक्के मिठाच्या पाण्यात ३ ते ५ मिनिटे पाने भिजवून सूक्ष्मजंतू नष्ट करावेत. तिसऱ्या वेळेस पुन्हा स्वच्छ पाण्याने धुवावीत. नंतर ही पाने फूड-ग्रेड जाळीच्या ट्रेवर पसरवून उरलेले पाणी निथळू द्यावे.यानंतर पानांचे देठ वेगळे करून फक्त निरोगी पाने ठेवावीत. खराब किंवा रोगट पाने बाजूला काढावीत. उरलेल्या फांद्या जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरता येतात.

शेवग्याची पाने वाळवण्याची पद्धत : पाने वाळवण्यासाठी तीन पद्धती वापरल्या जातात. पहिली म्हणजे हवेशीर खोलीत रॅकवर पाने पातळ थरात पसरवून वाळवणे. दुसरी पद्धत म्हणजे सौर ड्रायरचा वापर. यात ३५ ते ५५ अंश तापमानावर पाने वाळवली जातात. तिसरी पद्धत म्हणजे इलेक्ट्रिक किंवा हॉट एअर ड्रायरचा वापर, ज्यामध्ये कमी वेळेत मोठ्या प्रमाणात पाने सुकवता येतात.पूर्णपणे वाळलेली पाने ग्राईंडिंग मिलमध्ये दळून पावडर तयार केली जाते. ही पावडर ओलावा शोषून घेणारी असल्यामुळे पुन्हा थोडावेळ वाळवणे आवश्यक असते. शेवटी पावडर स्वच्छ, हवाबंद पॅकिंगमध्ये भरावी. पॅकेजिंग करताना हातमोजे, मास्क आणि टोपी वापरणे आवश्यक आहे.अशा पद्धतीने शेवग्याच्या पानांची पावडर तयार करून शेतकरी कमी खर्चात चांगला नफा कमवू शकतात. हा व्यवसाय ग्रामीण भागासाठी उत्तम उत्पन्नाचा पर्याय ठरत आहे.

## लाळ्या खुरकुत रोगास प्रतिकारक लाल सिंधी गाय



भारतात दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या गायींच्या जातीत लाल सिंधी गायीला विशेष महत्व आहे. मुख्यत: दूध उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या या गायींची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहेत.

उगम : या गायीचा उगम पाकिस्तान येथील कराची तसेच भारतातील हैद्राबाद, बिकानेर येथे झाला आहे. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाब मध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ऑस्ट्रेलिया, श्रीलंका ब्राझील आणि अमेरिका या देशातही या जाती आढळतात.

शरीर रचना : या जातीच्या गायीचे शरीर गडद ते फिकट लाल रंगाचे असते. त्यांच्या शरीरावर पांढरे पट्टेही दिसतात. लाल सिंधी जातीची गाय मध्यम आकाराची असते. सिंधी गायीचे डोके रूंद, शिंगे लहान व जाड, शेपटी लांब व पाय लहान असतात. या जातीच्या गायीचे सरासरी वजन ३.१५ क्विंटल आणि उंची सुमारे ११५ सें. मी. बैलाचे सरासरी वजन ४.५ क्विंटल आणि उंची सुमारे १३२ सेमी असते.

प्रजोत्पादन आणि उत्पादन : या गायीचा प्रथम माजावर येण्याचा कालावधी हा ३९ ते ५० महिन्याचा असतो. दूध देण्याचा कालावधी २७० दिवस असून सरासरी दूध उत्पादन ११८८ ते १६७५ लिटर आहे. ही गाय एका दिवसात ६ ते ८ लिटर दूध देते.

इतर विशेषता : या गायीचे सरासरी आयुष्य १५ वर्षाचे असते. उष्णता, टिक प्रतिकार, रोग प्रतिकार, उच्च तापमानात प्रजनन इत्यादी सहन करण्याच्या क्षमतेमुळे लाल सिंधी गायी शतकानुशतके वापरली गेली आहे. लाल सिंधी गुरांचे संगोपन प्रामुख्याने भारतात दुग्धशाळेच्या जाती म्हणून केले जाते. पण इतर देशांमध्ये ते मांसासाठी देखील वाढवले जाते. या गायीची थायलेरीयासिस आणि लाळ्या खुरकुत रोगासाठी चांगली रोगप्रतिकारशक्ती असते. बैल शेती व वाहतुकीच्या कामासाठी उपयुक्त असतात. ती आकाराने लहान व बदलत्या हवामानाशी समरस होऊ शकतात.

## शेतकऱ्यांनो सोयाबीन उगवण क्षमता तपासणी कशी करावी, जाणून घ्या..




कृषी विभागाच्या मते सोयाबीन उत्पादकांनी सोयाबीनची पेरणी करण्यापूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासून पेरणी करावी. ज्या बियाण्यांची उगवण क्षमता ही उत्तम असेल अशाच बियाण्याची पेरणी शेतकऱ्यांनी करावी जेणेकरून सोयाबीन पिकातून विक्रमी उत्पादन शेतकऱ्यांना मिळवता येईल. सोयाबीनची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते.

हे स्वपरागसिंचीत पीक असल्याने या पिकाचे बियाणे सरळ वाणांचे आहे. त्यामुळे दरवर्षी बियाणे बदलाची आवश्यकता नाही. मागील दोन वर्षात पेरणी केलेल्या प्रमाणित बियाण्यांपासून उत्पादीत होणारे सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी वापरल्यास उत्पादन खर्च कमी होऊ शकतो. उगवण क्षमता तपासणी करण्याकरिता गोणपाट किंवा वर्तमानपत्राचा कागद वापरावा. एका ओळीमध्ये १.५ ते २ सें.मी. अंतरावर १० दाणे ठेवावेत. अशा प्रकारे १० ओळींमध्ये एकूण १०० दाणे व्यवस्थित रांगेत ठेवावे. त्यानंतर गोणपाटावर अथवा वर्तमानपत्रावर पाणी टाकून ओले करावेत. ते गोल गुंडाळून थंड ठिकाणी सावलीत ठेवावे.

अधूनमधून त्यावर पाणी शिंपडत राहावे. सहा ते सात दिवसांनंतर कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजावेत. जर उगवण झालेल्या बियाण्यांची सरासरी संख्या सत्तर किंवा त्यापेक्षा अधिक असेल, तर आपले बियाणे बाजारातील बियाण्यासारखेच गुणवत्तेचे आहे असे समजावे. शिफारशीप्रमाणे ते आपल्याला पेरणीसाठी वापरता येईल. उगवण झालेल्या बियाण्याची सरासरी संख्या सत्तरपेक्षा कमी असेल, तर एकरी बियाण्याचे प्रमाण त्यानुसार वाढवून पेरणी करावी.

मात्र, साठ टक्क्यांपेक्षा कमी उगवणशक्ती असणारे सोयाबीन बियाणे पेरणीसाठी वापरू नये.

## गायींना होणारे आजार आणि घरगुती उपाय !



राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, शेतकरी अनेकदा गायींना होणारे आजार आणि त्यांच्या आरोग्याकडे विशेषत्वाने लक्ष देत नाहीत. ज्यामुळे दुधाळ गायींना नकळत अनेक आजार जडतात. परिणामी, गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन दूध उत्पादनाला मोठा फटका बसतो. विशेष म्हणजे दररोज गायींकडे निरीक्षणातून या आजारांवर लक्ष ठेवले जाऊ शकते. तसेच काही घरगुती उपाय करून देखील दुधाळ जनावरांवर बरे केले जाऊ शकतात.

आर्थिक फटका बसतो : दुग्ध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना गायींना होणाऱ्या आजारांच्या घरगुती उपायांबद्दल माहिती असेल. तर शेतकरी आपल्या गायींना निरोगी ठेवण्यात सक्षम राहू शकतात. याउलट शेतकऱ्यांना माहिती नसेल तर एखादा छोटा आजार देखील मोठे रूप धारण करू शकतो. ज्यातून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे पशुपालन व्यवसाय करताना पुढील आजारांबाबत माहिती असणे आवश्यक असते.

शरीराला गोचीड होणे : गाईंना त्यांच्या शरीराला गोचीड झाल्यास, कडुलिंबाची पाने गरम पाण्यात चांगली उकळून घ्यावीत. आणि ते पाणी चांगले थंड झाल्यानंतर त्याची फवारणी गायींच्या अंगावर करावी. हा उपक्रम नियमित करायचा. ज्यामुळे गायींना होणाऱ्या गोचीडची समस्या पूर्णपणे संपुष्टात येते.

निमोनिया आजार : निमोनिया हा आजार दुधाळ गायींसाठी खूप त्रासदायक असतो. पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या मते, गायी जास्त काळ पाण्यात भिजल्यास न्यूमोनिया होतो. न्यूमोनियामुळे गाईच्या शरीराचे तापमान वाढते. श्वास घेण्यास त्रास होतो आणि नाकातून पाणी वाहू लागते. ही लक्षणे गायीमध्ये दिसल्यास टर्पेन्टाइन तेल उकळत्या पाण्यात टाकावे आणि वाफ जनावराने आत घ्यावी. यासोबत मोहरीच्या तेलात कापूर मिसळून जनावरांच्या बरगड्यांची मालिश करावी. हिवाळ्यात गाईला न्यूमोनियापासून वाचवण्यासाठी तिला गरम वाफ द्यावी.जार न पडणे : गाय व्यायल्यानंतर पुढील पाच तासांत जार पडणे आवश्यक असते. असे झाले नाही तर गाय दूधही देत नाही. त्यामुळे वेळेत जार न पडल्यास ताबडतोब पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. यासोबतच दुधाळ गायीचा मागील भाग गरम पाण्याने धुवावा. असे करताना कोणत्याही परिस्थितीत जाराला स्पर्श करू नये किंवा जार खेचण्याचा प्रयत्न करू नये.

शरिराला जखम झाल्यास :दुधाळ गाय किंवा म्हैस यांना दुखापत झाल्यास, त्यावर तात्काळ इलाज करणे आवश्यक असते. त्यासाठी गायीला किंवा म्हशीला जखम दिसल्यास तात्काळ गरम पाण्यात फिनाईल किंवा पोटॅश टाकून स्वच्छ करावे. त्यामुळे जखमेत किडे असल्यास, टर्पेन्टाइन तेलात भिजवून जनावराच्या त्या भागावर पट्टी बांधावी. तोंडाच्या जखमा नेहमी तुरटीच्या पाण्याने धुवाव्यात. पण त्याचवेळी जखमेशी संबंधित उपाय जाणून घेण्यासाठी डॉक्टरांशी वेळोवेळी संपर्क साधावा.




### महत्वाच्या घटना

१५०७ : इंग्लंड आणि नेदरलँड्स या दोन्ही देशांनी व्यापार करारावर आपली सहमती दर्शविली.
१६५९ : मुघल बादशाहा औरंगजेब यांनी दिल्ली येथे राज्याभिषेक केला.
१८४९ : डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध-पीडमाँटची लढाई दक्षिणेचा पराभव.
१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.
१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९२४ : अर्न्स्ट अलेक्झांडरसनने पहिला फॅक्स संदेश स्वतःच्या वडिलांना पाठवला.
१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.
१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.
१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.
१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा' पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.
१९७४ : जागतिक पर्यावरण दिन
१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.
१९८० : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.
१९८४ : अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीने मंदिरावर हल्ला करण्याचा आदेश दिला.
१९८९ : चीनची राजधानी बिजींगच्या तियेनआनमेन चौकातील चळवळीदरम्यान एका अज्ञात निःशस्त्र व्यक्तीने रणगाड्यासमोर उभे राहून रणगाडा थांबवला. हे छायाचित्र या चळवळीचा मानबिंदू ठरले.
१९९४ : ब्रायन लारा यांनी नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडॅम स्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१८७९ : नारायण मल्हार जोशी, भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक.
१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)
१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)
१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया चे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)
१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.
१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.
१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन यांचा जन्म.
१९७२ : भारतीय पुजारी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : अमेरिकन लघुकथा लेखक ओ. हेनरी यांचे निधन.
१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.
१९४२ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील प्रतिभाशाली गझल आणि गीत गायक मास्टर मदन यांचे निधन.
१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर २०११)
१९७३ : मा. स. गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक.
१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.
१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९३३)
१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले यांचे निधन.
२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे निधन. (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)
२०१६ : एलिनॉर झेलियट (अमेरिकन लेखिका आणि इतिहासकार, जन्म: ८ ऑक्टोबर १९२६).
२०१७ : भारतातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्र येथून सर्वात जास्त जड वजनी ''जीएसएलव्ही मार्क -३ डी -१'' रॉकेट्? चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.७ जुलै २०२६ ५




# राष्ट्रमाता जिजाऊ स्मृतीज्योत रथयात्रेचे जामखेडमध्ये स्वागत

## जिजाऊंच्या विचारांतून स्वराज्य, समता व राष्ट्रनिष्ठेचा संदेश; मान्यवरांचे प्रतिपादन

जामखेड : प्रतिनिधी

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त सिंदखेडराजा ते पाचाड या ऐतिहासिक स्मृतीज्योत रथयात्रेचे सोमवारी जामखेड शहरात शिवभक्तांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत व 'जय जिजाऊ, जय शिवराय'च्या जयघोषात स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. स्वागत समारंभात जिजाऊंचे वंशज भागवत राजे जाधव म्हणाले, राष्ट्रमाता जिजाऊ यांनी सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामागे जिजाऊंचे संस्कार, दूरदृष्टी आणि राष्ट्रप्रेमाची शिकवण होती. त्यांच्या कार्यातून स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि लोककल्याणाचा आदर्श समाजासमोर उभा राहिला.



प्रा. मधुकर आबा राळेभात यांनी सांगितले की, जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यासारखे आदर्श नेतृत्व घडवून इतिहासाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार झाली आणि आजही ती समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी म्हणाल्या, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनातून अन्याय, अत्याचार आणि गुलामगिरीविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळते. स्त्रीशक्ती, सामाजिक समता आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश देणारे त्यांचे कार्य आजही तितकेच मार्गदर्शक असून त्यांच्या विचारांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी काका राळेभात यांनी सांगितले की, सिंदखेडराजा ते पाचाड ही ऐतिहासिक स्मृतीज्योत रथयात्रा जामखेड शहरातून जात असल्याने हा प्रत्येक जामखेडकरासाठी अभिमानाचा क्षण आहे. या रथयात्रेच्या माध्यमातून राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचत आहे. यावेळी प्रा. मधुकर आबा राळेभात, शहाजी काका राळेभात, नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, अवधूत पवार, नंदाताई होळकर, सिमाताई कुलकर्णी, सुमनताई शेळके, मोहन पवार, पवन राळेभात, मनोज कुलकर्णी, राजेंद्र गोरे, वसीम सय्यद, प्रशांत राळेभात, कॅप्टन भोरे, तात्यासाहेब बांदल, गुलाब जांभळे, विनायक राऊत, हरिभाऊ आजबे, अमित जाधव, कुंडल राळेभात, संभाजी मुळे, संभाजी ढोले, डॉ. भरत देवकर, सागरशेठ अंदुरे, प्रविण उगले, अनिल अडाले, सचिन शिंदे, बजरंग सरडे, गणेश हागवणे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. स्मृतीज्योत रथयात्रेच्या स्वागतामुळे जामखेड शहर शिवमय झाले होते. जिजाऊंच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आणि स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महावितरणच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांच्या मुलाचा जीव गेला

## कृष्णा मच्छिंद्र उगले या युवकाला करंटचा धक्का लागून मृत्यू

बीड

सध्या शेतामध्ये मशागतीचे दिवस सुरू असून शेतकऱ्यांकडून पेरणी व कपाशी पिकांची लागवड केली जात आहे अशातच शेतामध्ये गेलेल्या युवा शेतकऱ्याला शेतामधून गेलेले ते ३३ केव्ही मेन लाईटचे काम अर्धवट सोडून तारीख शेतामध्ये सोडल्याने शेतकऱ्याला अंदाज न आल्याने त्याच मेन लाईटला स्पर्श झाल्याने युवा शेतकरी प्रश्ना मच्छिंद्र उगले या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून या घटनेने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे.



ही घटना बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील हाजीपुर या ठिकाणी घडली असून महिनाभरापूर्वी याच कृष्णा मच्छिंद्र उगले या शेतकऱ्याचा मोठा भाऊ अपघातामध्ये दगावला आहे उगले कुटुंबावरती दुःखाचा डोंगर कोसळला असून एकाच महिन्यामध्ये दोन मुलांना गमावल्याचे दुःख मच्छिंद्र उगले यांना आहे मात्र महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे एका युवा शेतकऱ्याला आपला जीव गमावा लागला आहे शेतामध्ये काम करण्यासाठी गेलेले शेतकऱ्याला महावितरण कंपनीने सुरू केलेल्या ३३ केव्ही मेन लाईटचे काम अर्धवट सोडल्याने हा प्रकार घडल्याचे गावकऱ्यांनी सांगितला आहे महावितरण कंपनीला या अगोदर अनेक अर्ज आणि निवेदन दिले होते दखल घेतली असती तर हा प्रकार झाला नसता आम्ही अनेक वेळा महावितरण कंपनी यांना कळवले होते की तुमची जी तार आहे ती तात्काळ कट करून घ्या आणि होणारा अडथळा किंवा जीवित हानी टाळा असे सांगूनही त्यांनी दुर्लक्ष केले मात्र महावितरण कंपनीच्या घालताना कारभारामुळे एका युवा शेतकऱ्याला आपला जीव गमावा लागला आहे हा संपूर्ण प्रकार बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील हाजीपुर या ठिकाणी घडला असून यामध्ये कृष्णा मच्छिंद्र उगले या तरुणाचा मृत्यू झाला आहे याच कुटुंबातील महिनाभरापूर्वी कृष्णा उगले यांचा मोठा भाऊ रामेश्वर उगले यांनी आपला अपघातामध्ये जीव गमावला आहे एकाच महिन्यात घरातील दोन तरुण गेल्याने उगले कुटुंबा वरती दुःखाचा डोंगर कोसळला असून महावितरण कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी आता जोरदारपणा पाहायला मिळत आहे.

# ऑनलाइन शॉपिंगमध्ये चुकीचे उत्पादन, फ्लिपकार्टला दीड लाखांचा दंड

जालना। प्रतिनिधी

ऑनलाइन शॉपिंग प्लॅटफॉर्म फ्लिपकार्टवरून मागवलेल्या एअर प्युरिफायरच्या बदल्यात दुसरेच मॉडेल पाठवणे आणि त्यानंतर ग्राहकाच्या तक्रारीची दखल न घेणे फ्लिपकार्टला चांगलेच महागात पडले आहे. आदिलाबाद जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने या प्रकरणात फ्लिपकार्ट इंटरनेट प्रायव्हेट लिमिटेडला सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीसाठी जबाबदार धरून दीड लाखांपेक्षा जास्त रकमेचा दंड ठोठावला आहे. दिवाळीच्या काळात ॲलर्जी आणि धुळीच्या त्रासामुळे तातडीने खरेदी केलेल्या उत्पादनाबाबत झालेल्या या हलगर्जीपणामुळे ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.





या प्रकरणात, तक्रारदार राठोड स्वास्तिक यांनी २ ऑक्टोबर २०२५ रोजी फ्लिपकार्टवरून १०,३९९ रुपये किमतीचा 'क्युबो क्यू६००' मॉडेलचा एअर प्युरिफायर मागवला होता. सवलतीनंतर त्यांना हे उत्पादन ८,३९८ रुपयांना मिळाले. १६ ऑक्टोबर रोजी फ्लिपकार्टच्या 'ओपन बॉक्स डिलिव्हरी' (ओबीडी) अंतर्गत जेव्हा उत्पादन आले, तेव्हा त्यांना मागवलेल्या क्यू६०० मॉडेलऐवजी क्यू५०० हे कमी किमतीचे मॉडेल दिल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी डिलिव्हरी करणाऱ्या व्यक्तीला ओबीडी पॉलिसीनुसार डिलिव्हरी अयशस्वी नोंदवण्यास सांगितले, परंतु डिलिव्हरी स्वीकारल्यानंतरच बदलीची प्रक्रिया करता येईल, असे सांगून त्यांची विनंती फेटाळण्यात आली.डिलिव्हरी स्वीकारल्यानंतर तक्रारदाराच्या असे लक्षात आले की, फ्लिपकार्टच्या वेबसाईटवरील त्या उत्पादनाचे पेज बदलून तिथे क्यू६०० ऐवजी क्यू५०० मॉडेल दाखवले जात होते. सुरुवातीला फ्लिपकार्टने बदलीची विनंती मंजूर केली, परंतु नंतर 'उत्पादन स्टॉकमध्ये नाही' असे कारण देत ती रद्द केली, तर दुसरीकडे तक्रार निवारण कॉल दरम्यान प्रतिनिधींनी तोंडी कबूल केले होते की उत्पादन सूचीमध्ये बदल झाला आहे. या चुकीच्या डिलिव्हरीमुळे आणि तक्रार निवारणातील अपयशामुळे व्यथित होऊन तक्रारदाराने जिल्हा ग्राहक आयोगाकडे धाव घेतली.आयोगाने नोटीस बजावूनही फ्लिपकार्ट आणि संबंधित विक्रेता सुनावणीसाठी हजर राहिले नाहीत, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध एकतर्फी कारवाई करण्यात आली. आयोगाने तक्रारदाराने सादर केलेले पुरावे, जसे की बिल, ईमेल, कॉल रेकॉर्डिंग आणि फ्लिपकार्ट प्रतिनिधींसोबतच्या संभाषणाचे तपशील तपासले. चुकीचे उत्पादन मिळताच तक्रारदाराने त्वरित तक्रार करूनही कंपनीने त्याचे निवारण केले नाही किंवा प्रभावी बदली उपलब्ध करून दिली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आले. आयोगाने नमूद केले की, दिवाळीच्या काळात प्रदूषण वाढलेले असताना ॲलर्जी आणि धुळीच्या संवेदनशीलतेमुळे वैद्यकीय गरजेपोटी तक्रारदाराने हे उत्पादन खरेदी केले होते. कंपनीच्या या वागणुकीमुळे त्यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला. फ्लिपकार्टचे हे कृत्य म्हणजे सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार प्रथा आहे, असे निरीक्षण नोंदवत आयोगाने तक्रारदाराची बाजू मान्य केली. त्यानुसार, आयोगाने फ्लिपकार्टला उत्पादनाची रक्कम ८,३९८ रुपये १२% व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. यासोबतच, मानसिक त्रासाची भरपाई म्हणून १,५१,००० रुपये आणि खटल्याचा खर्च म्हणून ७,००० रुपये ४५ दिवसांच्या आत देण्याचे निर्देश दिले.

# आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार

## 'व्हॉट्सॲप' चॅनल आणि 'पब्लिक ॲप' वर!

मुंबई । प्रतिनिधी

समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सॲप' चॅनल आणि 'पब्लिक' ॲप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत. आता नागरिक 'व्हॉट्सॲप' चॅनलवर , या नावाने, तर पब्लिक ॲपवर महाराष्ट्र शासन () या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या 'पब्लिक ॲप' वर आणि 'व्हॉट्सॲप चॅनल' वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

# पुजाऱ्याच्या मुलावर उपचारास भक्ताकडून १० लाख

तुळजापूर । प्रतिनिधी

तुळजाभवानी मातेच्याचरणी हिंगोलीतील डॉ. सौरभ मसारे यांनी एक किलो वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केला आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील डॉ. मसारे यांनी शुक्रवारी (दि. ३) सहकुटुंब तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. या वेळी डॉ. मसारे यांनी त्यांचे आजोबा कै. प्रभाकर मसारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मातेला एक किलो वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केला. या वेळी मंदिर संस्थानच्या वतीने जिल्हाधिकारी पुजार यांनी डॉ. मसारे यांचा सत्कार केला.

प्रतिनिधी । तुळजापूर तुळजाभवानी मातेचे पुजारी चेतन शेळके यांच्या मदतीला तुळजाभवानी मातेचे भक्त धावून आले आहेत. पुजारी चेतन शेळके यांचा थायलेसेमिया हा दुर्मिळ आजाराने ग्रस्त पाच वर्षाचा मुलाचा उपचारासाठी तुळजाभवानी मातेचे मुंबईचे भक्त प्रथमेश शेटे यांनी तब्बल १० लाख रुपयांची रोख रक्कम दिली आहे. तुळजाभवानी मातेचे पुजारी चेतन शेळके यांचा ५ वर्षाचा मुलगा श्रेणीक याला थायलेसेमिया हा दुर्मिळ आजार झाला आहे. याचा उपचारासाठी डॉक्टरांनी सुमारे ४० लाख रुपये खर्च सांगितला आहे.

चेतन शेळके यांची परिस्थिती हालाखीची असून, मुलाचा उपचारासाठी मित्र परिवाराकडून आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले होते. मदतीचा आवाहनाला प्रतिसाद देत तुळजाभवानी मातेचे मुंबईचे भक्त प्रथमेश शेटे यांनी तब्बल १० लाख रुपयांची रोख रक्कम दिली आहे. यावेळी पुजारी गणेश अणदूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# वाढीव करावर श्रीरामपूरकर संतापले:आज शहर बंदची हाक

## चुकीची घरपट्टी किंवा व्यावसायिक कर आकारला तर तत्काळ हरकत घ्या

श्रीरामपूर । प्रतिनिधी

वाढीव कराबाबत सध्या नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कर वसुलीत कोणावरही अन्याय होऊ देणार नाही नागरिकांनी आपल्या हरकती विहित मुदतीत नगरपरिषद कार्यालयाकडे जमा कराव्यात असे आवाहन नगराध्यक्ष करण ससाणे आणि मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांनी केले आहे. नगराध्यक्ष करण ससाणे आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी सांगितले की सदर वसुली ही शासनाच्या निर्देशानुसार होत आहे की जी दर चार वर्षांनी होणे गरजेचे आहे.



प्रत्येक चार वर्षांनंतर घरपट्टीची रिविजन व्हावी हा शासनाचा नियम असून जर रिविजन केली नाही तर शासनाकडून येणारे अनेक निधी बंद होतील अशा प्रकारचे पत्रव्यवहार डीएमए ऑफिसकडून झालेले आहेत. सदर रिविजनच्याच्या नोटिसा ज्या नागरिकांना आलेल्या आहेत त्यामध्ये दोन प्रकारच्या तारखा म्हणजेच दोन वेळेस हरकत घेण्याची संधी प्रत्येक नागरिकाला मिळणार आहे. हरकत घेणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी फक्त वाढीव पट्टीला माझी हरकत आहे असे न म्हणता कोणत्या कारणाने पट्टी वाढली आहे आणि जर त्याचा काही पुरावा असेल तर सदर पुरावा हरकती बरोबर जोडावा. जेणेकरून तारखेच्या वेळेस वेळ वाया जाणार नाही. आज श्रीरामपूर बंदची हाक श्रीरामपूर नगरपरिषदेने गाळेधारक व घरांना दुप्पट तिप्पट कर आकारण्यात आला आहे.

तो कर त्वरित कमी करण्यात यावा तसेच मालमत्तेचे फेर सर्वेक्षण करण्यात यावे या मागणीसाठी आज रविवार सर्वपक्षीय बंदची हाक दिली आहे. तरी सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन सुभाष त्रिभुवन, गौतम उपाध्ये, बाबा शिंदे, अरुण नाईक, संतोष डहाळे, उमेश पवार, लखन भगत, कैलास बोर्डे, तेजस गायकवाड, मुक्तार शहा आदींनी केले आहे.

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना

**राज्यातील शेतक-यांना निसर्गाचा लहरीपणा सांभाळत शेती करावी लागते आणि त्या शेतीसाठी मेहनत घेऊनही अनेकदा अतिवृष्टी दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असते. पीक आले नाही तर उत्पन्न नाही आणि परिणामी शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नाही. या मुळे शेतकरी वर्ग सतत चिंतेत असतो. शेतकरी वर्गास नापिकी आणि कर्ज थकणे या दुष्टचक्रात अडकून पडावे लागते. शेतकरी वर्गास प्राधान्य देणाऱ्या सरकारने यासाठीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ ही जाहिर केली आहे. या रूपाने ही आजवरची सर्वात मोठी आणि राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारी महाकर्जमुक्ती ठरली आहे.**

शेतकरी बांधवांना २ लाख रुपयांपर्यंत असणारे कर्ज माफ होणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांपेक्षा जादा असलेला थकीत कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. आणि जे शेतकरी कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचाही विचार या योजनेत झाला आहे. नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम या कर्जमुक्ती मोहिमेत दिली जाणार आहे. शासन स्तरावर शेतकरी वर्गास प्राधान्य देण्याची जी भूमिका आहे त्याचाच एक भाग म्हणून याकडे आपणास बघता येईल. शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतानाच





पिकाचा विमा घेण्याचा सल्ला दिला जातो आणि त्यांच्या पिकाचा विमा देखील काढला जातो. ही योजना प्रधानमंत्री फसल विमा म्हणून सर्वांना परिचित आहे. या अंतर्गत वेळोवेळी पिकाचे नुकसान आलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई दिलेली आहे. बीड जिल्हा हा मुख्यत्वे शेतीवर आणि अनुषंगिक व्यवसायांवर आधारित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना २ लाखांची कर्ज माफ योजना लाभाचीच ठरणार आहे. मात्र यापूर्वीही शासनाने आपली लक्ष्यात घेऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती शेतीपीक अनुदान वाटप केलेले आहे. याचाही नोंद यावेळी घेतली पाहिजे. जिल्ह्यात २०२५-२६ च्या खरिप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी या दोन्हीमुळे जिल्ह्यात शेतीपिकाचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १४५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम देऊ केली सोबतच याचवर्षी रब्बी हंगामात पेरणीसाठी अनुदान म्हणून ६५० कोटी रुपये अनुदान दिले. सोबतच पिक विमा भरपाई वेगळी आहे आणि त्यानंतर आता या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी २०२६ याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यास २ लाख रुपये कर्जमाफी देखील दिली आहे. शेतकरी हा मुख्य घटक मानुन शेतकरी हित केंद्रीत या सर्व भूमिकेमुळे शासन शेतकऱ्याला नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून मुक्त करण्यास कटिबद्ध आहे याचीच खात्री शेतकऱ्यांना दिली आहे.

**प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.०७ जुलै २०२६ | ६

# बीड नगरपरिषदेत फक्त बैठकांचे सत्र; अनेक विकासकामे रखडली

## बीड न.प.च्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

**बीड नगरपरिषदेत गेल्या दोन ते अडीच महिन्यांनंतर नुकतीच एक बैठक पार पडली. मात्र, या बैठकीत केवळ चर्चा झाली असून शहराचा कोणताही ठोस विकास आराखडा किंवा प्रलंबित मागण्यांवर काम झाले नसल्याचा आरोप बीड न.प.च्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केला आहे. स्थायी समिती आणि सर्वसाधारण बैठकीतही मांडलेले प्रस्ताव अद्याप एका पाऊलही पुढे सरकले नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.**

बीड नगरपरिषदेत सोमवारी (दि.६) झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, मान्सूनपूर्व नालेसफाईसाठी १८ नाल्यांची यादी देण्यात आली होती. या कामासाठी ३८ ते ४० लाख रुपयांची तरतूद असूनही, प्रत्यक्षात ६ ते ७ ठिकाणी पाहणी केली असता नाल्यांची परिस्थिती जैसे थे आहे. शहरात मध्य मान्सून सुरू असतानाही नालेसफाई पूर्ण झालेली नाही. बीड शहराच्या सुरक्षेसाठी एलईडी लाईट्सची मोठी गरज आहे, मात्र यावर नवीन कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच, कलेक्टर ऑफिसकडून मंजूर झालेल्या १ कोटीच्या निधीतून ४० हायमास्ट बसवणे गरजेचे आहे. यामध्ये कोणतीही अफरातफर किंवा बदल न करता जुन्या



यादीनुसारच काम व्हावे, अशी मागणी त्यांनी केली. १५ व्या वित्त आयोगांतर्गत आलेला सुमारे २६ कोटी रुपयांचा निधी पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसाठी वापरणे अपेक्षित आहे. परंतु, हा निधी नेमका कुठे आणि कसा वाटप केला जाणार, याचे कोणतेही स्पष्ट उत्तर नगरसेवकांना मिळालेले नाही. हा निधी योग्य पद्धतीने वापरल्यास लाईट बिल, स्वच्छता आणि डम्पिंग ग्राउंडसारखे मोठे प्रश्न सुटू शकतात. शहरात गरजेच्या तुलनेत मुरूम खरेदी केवळ २० ते ३० टक्केच होऊ शकली आहे. प्रत्येक प्रभागात समान पातळीवर ८० लाखांच्या क्रॉसिंग आणि पाईपलाईनचे योग्य डिस्ट्रीब्यूशन व्हावे, अशीही मागणी केली. सध्या सुरु असलेल्या बैठका केवळ नावापुरत्या असून बीडच्या जनतेला कोणत्याही मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे सांगत, नागरिकांनी आता डोळे उघडून ही परिस्थिती पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच, सध्या बीड नगरपरिषदेचा कारभार प्रभारी मुख्याधिकाऱ्यांकडे आहे. ते गेवराई नगरपरिषदेचे कामही पाहत आहेत. बीड शहरासाठी आधीचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यासारखे सक्षम आणि कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळावेत, अशी मागणी डॉ.क्षीरसागर यांनी केली.

### स्व.अजितदादा पवारांचे नाव बीड खराब करण्याचे काम बीड न.प.कडून सुरूय...

आम्ही नगरसेवक होऊन आठ महिने झाले, पण प्रभागातील लोकांना काय द्यायचे? हा प्रश्न पडला आहे. केवळ फेसबुक आणि इंस्टाग्रामवर टीका करणाऱ्या ५-१० लोकांपेक्षा, प्रत्यक्षात येऊन शेकडो नागरिक आमच्याकडे तक्रारी करत आहेत. नगराध्यक्ष आणि त्यांच्या टीमची मानसिकता काम करण्याची दिसत नाही. अजितदादा पवार यांच्या नावावर लोकांनी यांना निवडून दिले, पण त्यांच्याकडून दादांच्या नावाचा आणि पक्षाचा नावलौकिक खराब केला जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिली.

### प्रभारी मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड शहरातील विविध समस्या डॉ.सारिकाताई क्षीरसागरांसह नगरसेवकांनी मांडल्या. त्यानंतर प्रभारी मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांचा डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांनी सत्कार केला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



बीड : गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एल. डी. जायभाये यांची पोलीस खात्यांतर्गत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांना स्टार लावताना पो.नि. किशोर पवार, स.पो.नि. अण्णासाहेब पवार समवेत स.पो.नि. अतुल कुमार, समाधान दौड, पोलीस उपनिरीक्षक राम खोत, आप्पासाहेब रोकडे आदी पोलीस कर्मचारी.

# चोर पकडला गावकऱ्यांनी; पोलीस म्हणाले, ठाण्यात घेऊन या!

## पात्रुडमध्ये ग्रामीण पोलिसांवर निष्क्रियतेचा आरोप; वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिक संतप्त

माजलगाव । प्रतिनिधी

पात्रुड गावात चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका संशयिताला ग्रामस्थांनी पहाटे रंगेहात पकडले. मात्र,पोलिसांना माहिती दिल्यानंतरही घटनास्थळी न येता पोलीस गाडी गस्तीवर आहे, तुम्हीच त्याला ठाण्यात घेऊन या, असा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.या प्रकारामुळे माजलगाव ग्रामीण पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

माजलगाव तालुक्यातील पात्रुड गावात सातत्याने चोरीच्या घटना घडत असल्याने





नागरिकांनी स्वतःच रात्रीचे गस्ती पथक सुरू केले आहे.तत्पूर्वी सहा ते सात चोरीच्या घटना पात्रुड या गावात घडल्या आहेत. या कारणाने गावात गस्ती करत असताना दि ०५ जुलै रविवार रोजी पहाटे सुमारे २:०० वाजण्याच्या सुमारास ६ ते ७ चोरटे गावात शिरल्याची माहिती ग्रामस्थांना झाली. यावेळी गस्ती दरम्यान एका संशयिताला पकडल्यानंतर ग्रामस्थांनी तत्काळ पोलिसांना संपर्क केला.मात्र, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेण्याऐवजी संशयिताला गावकऱ्यांनीच पोलीस ठाण्यात आणावे,असे सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या प्रतिसादावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.याप्रकरणी फिर्यादी कृष्णा रोहिदास बनकर यांच्या तक्रारीवरून एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, चोरी झालीच नसेल तर गुन्हा कशाला दाखल करता ? असेही पोलिसांनी यावेळी म्हटल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेबाबत अधिकच प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण आणण्यात पोलिसांना अपयश येत असल्याचा आरोप होत असून, या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ ◀◀ पान ३ वर

# बीड मतदारसंघातील नागरिकांनी एसआयआर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी-डॉ.योगेश क्षीरसागर

## मतदार यादीतील नाव कायम ठेवण्यासाठी 'बीएलओ'ला सहकार्य करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यात एसआयआर अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत असून, मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीरहित करण्यासाठी बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन तसेच बूथवर थांबून



मतदारांच्या माहितीची पडताळणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर बीड विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करून एसआयआरचा नमुना अर्ज भरून द्यावा, असे आवाहन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या या मोहिमेचा उद्देश कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये आणि अपात्र नावे मतदार यादीत राहू नयेत, हा आहे. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, बीएलओ आपल्या प्रभागात दररोज भेट देत असून नागरिकांनी त्यांना योग्य माहिती व आवश्यक कागदपत्रांची माहिती उपलब्ध करून द्यावी. एसआयआरचा फॉर्म वेळेत भरून दिल्यास मतदार यादीतील नाव अचूक राहण्यास मदत होईल. मतदार यादीतील नाव कायम राहणे ही प्रत्येक ◀◀ पान ३ वर

# मतदार पडताळणी प्रक्रियेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा-अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष मतदार पडताळणी मोहिमेत प्रत्येक नागरिकाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत सादर करावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते



एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मतदार पडताळणी मोहिमेत

### शिवसैनिकांनी घरोघरी पोहोचून मतदार पडताळणी पूर्ण करून घ्यावी –जगताप यांच्या सूचना!

सक्रियपणे सहभागी होत असून, नागरिकांपर्यंत ही प्रक्रिया सुलभपणे पोहोचविण्याचे काम करत आहेत. नागरिकांनीही ही केवळ शासकीय प्रक्रिया न समजता आपली लोकशाहीप्रती असलेली राष्ट्रीय जबाबदारी म्हणून सहकार्य करावे, असे आवाहन जगताप यांनी केले. येत्या काही दिवसांत तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी घरी येणाऱ्या बीएलओ () अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रे व भरलेले फॉर्म वेळेत उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना अनिलदादा ◀◀ पान ३ वर

# भालचंद्र विद्यालयाचे प्राचार्य किसन सावंत यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न



लिंबागणेश । प्रतिनिधी

लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयाचे प्राचार्य किसन बाळाराम सावंत (बापू) यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित कृतज्ञता सप्ताह सोहळा मोठ्या उत्साहात व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तब्बल ३३ वर्षे मोलाचे योगदान देणाऱ्या प्राचार्य सावंत यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सहकुटुंब गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भालचंद्र शिक्षण संस्थेचे सचिव दीपकदादा घुमरे होते. प्रमुख अतिथी म्हणून बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज, मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, संस्थेचे उपाध्यक्ष कल्याण बापू वाणी, संचालक रमेशचंद्र पाटील, कॅप्टन सुंदरराव वाणी, ह.भ.प. तुकाराम भारती महाराज, ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे, भागवत अण्णा ◀◀ पान ३ वर

# पत्रकार दिलीप झगडे यांना पितृशोक

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्हाध्यक्ष तथा माजलगाव येथील पत्रकार दिलीप झगडे यांचे वडील आसाराम बळवंतराव झगडे



(वय ७०, रा.शेलापुरी, ता. माजलगाव) यांचे दि ०५ जुलै रविवार रोजी रात्री ९:०० वाजता निधन झाले. बऱ्याच दिवसांनी ते आजारी होते. मूळ पात्रुड येथील रहिवासी असलेले आसाराम झगडे हे मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे परिसरात परिचित होते.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना,मुली,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर दि ०६ जुलै सोमवार रोजी दुपारी माजलगाव येथील मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती. झगडे यांच्या दुःखात दै.राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# पाटोद्यात भटक्या कुत्र्यांची दहशत, घरात घुसून लहान मुलांवर व शेळ्यांवर हल्ला; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील काही भागांमध्ये भटके कुत्रे थेट घरात घुसून लहान मुलांवर तसेच शेळ्यांवर हल्ले करत असल्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.लहान मुले घराबाहेर खेळण्यासाठी जाण्यास घाबरत असून, वृद्ध नागरिकांनाही रस्त्यावरून ये-जा करताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांचे कळप रस्त्यावर फिरत असल्याने अपघाताचा धोकाही वाढला आहे.नागरिकांनी संबंधित प्रशासन आणि नगरपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे, अशी मागणी शहरवासीयांनी केली आहे.





याबाबत नगरपंचायतीने तातडीने उपाययोजना करून भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण तसेच सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी मोहीम राबवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# सैनिक स्कूल विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि शिस्त यांचा दुहेरी संगम -पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी सैनिक स्कूलचा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष तथा मार्गदर्शक डॉ. सुरेश खुरसाळे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर होते. विशेष निमंत्रित म्हणून अंबाजोगाई चे उपजिल्हाधिकारी श्री दीपक वाजळे, श्री कर्नल सतीश हंगे उपसंचालक सैनिकी कल्याण विभाग हे होते.

योगेश्वरी शिक्षण संस्थेची सैनिक स्कूल या शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली. असून आज सहावीच्या पहिल्या तुकडीचा प्रवेशोत्सव ढोल ताशाच्या गजरात ,पारंपारिक हलगीच्या नादात तसेच गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेच्या मुलींच्या ढोल पथकाच्या वाद्य वृंदात झाला.

यावेळी बोलत असताना प्रमुख पाहुणे बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत () म्हणाले की मी सुद्धा सहावीपासून सैनिकी शाळेतच शिकलो. सैनिकी शाळेमध्ये शिक्षण आणि शिस्त या दोन्हीचा संगम घडवून विद्यार्थ्यांची घडवणूक केली जाते. विद्यार्थ्यांना स्वावलंबन तसेच आत्मविश्वास वाढावा याकरिता शिस्त लावली जाते. शिक्षणासोबत शिस्त असली की देशाचा एक सजग नागरिक बनण्यास अत्यंत काटेकोरपणे मदत होते. आज सहावीला विद्यार्थ्यांना सोडायला





आलेल्या पालकांना पाहून मला सुद्धा माझ्या सैनिकी शाळेच्या पहिल्या दिवसाची म्हणजे प्रवेशाची आठवण झाली. माझे ही पालक अशाच पद्धतीने सोडायला आले होते. याच सैनिकी शाळेच्या माध्यमातून मला लागलेल्या शिस्तीमुळे आज मी आयपीएस बनू शकलो. याचा मला सार्थ अभिमान आहे व असेच आपण सुद्धा सैनिकी शाळेमधून शिक्षण घेऊन देश सेवला स्वतःला अर्पण करून घ्यावे असा संदेश दिला.

यावेळी बोलत असताना योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉक्टर सुरेश खुरसाळे म्हणाले १९१७ साली लोकमान्य टिळकांच्या चतुसूत्री कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना झाली. तदपासून ते मागील चार वर्षांपूर्वी रक्षा मंत्रालयाकडे केलेल्या अर्जानुसार व चार वेळेस झालेल्या इन्स्पेक्शनद्वारे या सैनिकी शाळेतला मान्यता मिळाली व आज प्रवेशोत्सव होताना अत्यंत आनंद होत आहे. देशभक्तीपर विचारातून झालेल्या संस्थेच्या स्थापनेपासून ते सैनिकी स्कूलच्या होणाऱ्या प्रवेश पर्यंत विद्यार्थी देशसेवेसाठी घडविण्याचे काम या संस्थेद्वारे केले जात आहे व केले जात राहील. संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी प्रास्ताविक केले. अनेक प्रयत्नांती मिळालेल्या या सैनिक स्कूल मधून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन देशसेवा करावी असे मत व्यक्त केले.यावेळी सैनिक स्कूलचे प्राचार्य मेजर एस पी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना देश सेवेची प्रतिज्ञा सांगितली व त्यांच्याकडून ती म्हणून घेतली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांनी केले.या कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अंबाजोगाईतील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, नुकतेच प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश्वरी सैनिक स्कूलचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26